वर्ष: 6 अंक: 19
1-15 एप्रिल, 2026 (नि:शुल्क)

# न्यू इंडिया समाचार



राष्ट्रीय सागरी दिन 5 एप्रिल विशेष

## महासागर बनत आहेत संधींचा सेतू

'समृद्धी, प्रगती आणि उत्पादकतेसाठी बंदरे' हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा दृष्टिकोन सागरी क्षेत्रात परिवर्तनाची नवी गाथा लिहीत आहे ...

ई-कॉपीसाठी क्यूआर स्कॅन करा..

उत्कल दिन : 1 एप्रिल

# ओडिशाचा इतिहास, साहित्य आणि संगीताचा भारताला अभिमान आहे

*ओडिशा 1 एप्रिल रोजी आपला 90 वा स्थापना दिन साजरा करत आहे, जो उत्कल दिन म्हणून ओळखला जातो. याच दिवशी 1936 मध्ये ओडिशाची स्थापना भाषिक आधारावर तत्कालीन बिहार, मद्रास प्रेसिडेंसी आणि संयुक्त बंगालच्या काही भागांना वेगळे करून करण्यात आली होती. तेव्हापासून याच दिवशी 'उत्कल दिन' साजरा केला जातो. 2011 मध्ये याचे नाव बदलून 'ओडिशा' करण्यात आले होते. ही भूमी, जिथे सम्राट अशोकाने अहिंसेचा संदेश दिला, त्याच भूमीने स्वातंत्र्य लढ्यातही महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. भगवान जगन्नाथांच्या या पवित्र भूमीच्या इतिहासाचा, साहित्याचा आणि संगीताचा भारताला अभिमान आहे...*




> **उत्कल दिनाच्या हार्दिक शुभेच्छा. हा आपल्या देशाच्या प्रगतीमध्ये ओडिशा, ओडिया लोक आणि संस्कृतीच्या समृद्ध भूमिकेचा स्वीकार करण्याचा दिवस आहे. आगामी काळात ओडिशाच्या जनतेला उत्तम आरोग्य आणि समृद्धीचा आशीर्वाद लाभो.**
>
> **– नरेंद्र मोदी, पंतप्रधान**



न्यू इंडिया
**समाचार**

वर्षः 6, अंकः 19 । 1-15 एप्रिल, 2026

**प्रधान संपादक**
**धीरेंद्र ओझा**
प्रधान महासंचालक
पत्र सूचना कार्यालय , नवी दिल्ली

वरिष्ठ सल्लागार संपादक
**संतोष कुमार**

वरिष्ठ सहाय्यक सल्लागार संपादक
**पवन कुमार**

सहाय्यक सल्लागार संपादक
**अखिलेश कुमार**
**चंदन कुमार चौधरी**

भाषा संपादन
**सुमित कुमार (इंग्रजी)**
**रजनीश मिश्रा (इंग्रजी)**
**नदीम अहमद (उर्दू )**

वरिष्ठ डिझायनर
**फूलचंद तिवारी**

डिझायनर
**अभय गुप्ता**
**सत्यम सिंह**




**13 भाषांमध्ये उपलब्ध न्यू इंडिया समाचार वाचण्यासाठी येथे क्लिक करा.**


https://newindiasamachar.pib.gov.in/news.aspx

**न्यू इंडिया समाचारचे जुने अंक वाचण्यासाठी क्लिक करा.**

https://newindiasamachar.pib.gov.in/archive.aspx

न्यू इंडिया समाचार बद्दल सतत अपडेटसाठी फॉलो करा:-: @NISPIBIndia

# आतील पानांवर...




## मुखपृष्ठ कथा


राष्ट्रीय सागरी दिनानिमित्त (5 एप्रिल) चला जाणून घेऊया की गेल्या 11 वर्षांमध्ये भारताने जगातील प्रमुख सागरी शक्तींच्या पंक्तीत सामील होण्याच्या दिशेने कशा प्रकारे महत्त्वपूर्ण पावले उचलली आहेत. या प्रयत्नांमुळे 2047 पर्यंत सागरी क्षेत्रात सुमारे आठ ट्रिलियन रुपयांच्या गुंतवणुकीला चालना मिळण्याची आणि सुमारे दीड कोटी नवीन रोजगार निर्माण होण्याची अपेक्षा आहे...... | 12-27

**वृत्त सार** | 4-5

**व्यक्तिमत्व : बाबू जगजीवन राम**
ज्यांनी 1971 च्या युद्धात पाकिस्तानला दिले चोख प्रत्युत्तर | 7

**केंद्रीय मंत्रिमंडळाचे महत्वपूर्ण निर्णय**
जल जीवन मिशन 2.0, 3 प्रमुख कनेक्टिव्हीटी प्रकल्पाना मंजुरी | 28-29

**नव्या युगाची साक्षीदार बनत आहे दिल्ली**
पंतप्रधान मोदी यांनी दिली 33,500 कोटी रुपयांच्या विकासाची भेट | 30-31

**हाडोतीच्या आशांना नवी उभारी**
पंतप्रधान मोदी यांनी कोटा विमानतळाची पायाभरणी केली | 32-33

**पायाभूत सुविधांच्या ऊर्जेमुळे मजबूत होत आहे भारत**
पंतप्रधान मोदी यांनी केरळ आणि तामिळनाडूला 16,450 कोटी रुपयांच्या विकासकामांची दिली भेट | 34-35

**'अर्थसंकल्प' हे लोकांच्या आकांक्षा पूर्ण करण्याचे एक साधन**
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तिसऱ्या आणि चौथ्या अर्थसंकल्पोत्तर वेबिनारला संबोधित केले | 36-37

विकासाच्या पुढील टप्प्यावर..
**अशक्य शक्य करून दाखवत आहे भारत**
पंतप्रधान मोदींचे आयटीव्ही नेटवर्कच्या एनएक्सटी समिटमधील भाषण | 8-11





पीएम मुद्रा, ई-नाम आणि युपीआय
**आर्थिक सुरक्षेचे मजबूत चक्र**





पीएम मुद्रा , ई-नाम आणि युपीआयचा वर्धापनदिन. या योजनांमुळे आर्थिक मार्गक्रमण होत आहे सुकर | 38-40




**पंचतीर्थ**
एका महान व्यक्तिमत्वाला कृतज्ञ राष्ट्र वंदन करते


बाबासाहेब डॉ. भीमराव आंबेडकर यांची तत्त्वे आणि आदर्श आत्मनिर्भर आणि विकसित भारताच्या उभारणीला बळ आणि गती देणार आहेत..... पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 14 एप्रिल रोजी बाबासाहेबांच्या 136 व्या जयंतीनिमित्त त्यांचे स्मरण केले... | 6



**प्रकाशक :** कंचन प्रसाद, महासंचालक , सीबीसी (केंद्रीय संचार ब्युरो) **पत्र व्यवहार आणि ईमेलसाठी पत्ता :** खोली क्रमांक -1077, सूचना भवन , सीजीओ कॉम्प्लेक्स , नवी दिल्ली- 110003. **ईमेल - response-nis@pib.gov.in, आर.एन.आय. क्रमांक DELHIN/2020/78812**

संपादकांच्या लेखणीतून..

# सागराकडून समृद्धीकडे

## जागतिक सागरी नेतृत्वाच्या दिशेने वाटचाल करणारा भारत

सप्रेम नमस्कार

भारताची सागरी परंपरा प्राचीन आणि गौरवशाली राहिली आहे. चोल आणि मराठा साम्राज्याच्या काळात सागरी व्यापार आणि नौदल सामर्थ्याने भारताच्या समृद्धीला नव्या उंचीवर नेले होते. त्याच ऐतिहासिक वारशापासून प्रेरणा घेऊन, आज भारत आपल्या सागरी क्षेत्राला आधुनिक विकासाच्या नव्या टप्प्यावर घेऊन जात आहे. सुमारे 11 किलोमीटर लांबीची किनारपट्टी आणि जागतिक सागरी मार्गांवरील मोक्याच्या स्थानामुळे भारतामध्ये प्रचंड क्षमता आहे. 12 प्रमुख बंदरे आणि 217 इतर बंदरांसह सागरी वाहतूक आजही भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे.

मात्र, सुमारे एक दशकापूर्वीपर्यंत, हे क्षेत्र जुने कायदे, मर्यादित क्षमता आणि पायाभूत सुविधांच्या संथ विकासाशी झगडत होते. बंदरांची क्षमता, जहाजबांधणी आणि जलमार्गांच्या विस्ताराकडे पुरेसे लक्ष न दिल्यामुळे देशाच्या विशाल सागरी क्षमतेचा पूर्ण उपयोग होऊ शकला नाही. गेल्या 11 वर्षांमध्ये या क्षेत्रात लक्षणीय बदल झाले आहेत – स्वदेशी जहाजांची निर्मिती वेगाने होत आहे, बंदरांची क्षमता दुप्पट झाली आहे आणि जहाजांचा थांबण्याचा कालावधी कमी झाला आहे. सागरमाला कार्यक्रमामुळे बंदरांचे आधुनिकीकरण, उत्तम संपर्क व्यवस्था आणि किनारपट्टीवरील समुदायांचा विकास यांना चालना मिळत आहे. 'मेरिटाइम इंडिया व्हिजन 2030' अंतर्गत केंद्र सरकार भारताला जगातील एक अग्रगण्य सागरी शक्ती आणि जहाजबांधणी राष्ट्र म्हणून स्थापित करण्यासाठी सातत्याने कार्यरत आहे.

या सर्व गोष्टींवरून असे दिसून येते की भारत समुद्राकडून समृद्धीच्या दिशेने सातत्याने आगेकूच करत आहे , म्हणूनच 5 एप्रिल रोजी राष्ट्रीय सागरी दिनानिमित्त, भारताच्या सागरी सामर्थ्याचे पुनर्जागरण हीच यावेळच्या अंकाची आपली मुखपृष्ठ कथा बनली आहे.

याशिवाय, व्यक्तिमत्व मालिकेत बाबू जगजीवन राम,14 एप्रिल रोजी बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त कृतज्ञ राष्ट्राचे त्यांना अभिवादन, केंद्रीय मंत्रिमंडळाचे निर्णय ,आर्थिक सुरक्षा संबंधी म्हणून मुद्रा, ई-नाम आणि यूपीआय वरील माहितीसह पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे मागील पंधरवड्यातील कार्यक्रम यात समाविष्ट करण्यात आले आहेत.

तसेच अंकाच्या आतील पानावर 1 एप्रिल रोजी असलेला उत्कल दिन आणि मलपृष्ठावर देशातील चित्यांच्या वाढत्या संख्येवर विशेष माहिती अंतर्भूत आहे.


तुम्ही तुमच्या सूचना आम्हाला पाठवत रहा.

धीरेन्द्र

(धीरेंद्र ओझा)

हिंदी, इंग्रजी आणि इतर 11 भाषांमध्ये उपलब्ध असलेले हे पाक्षिक वाचा/डाउनलोड करा.
https://newindiasamachar.pib.gov.in/news.aspx

# आपले मनोगत...




## यूपीएससीसाठी उपयुक्त ,पुस्तक रूपात व्हावे उपलब्ध

मी गेल्या वर्षभरापासून नियमितपणे 'न्यू इंडिया समाचार' वाचत आहे. माझ्या यूपीपीएससीच्या तयारीसाठी ते खूप उपयुक्त आहे, कारण यामध्ये मला चालू घडामोडी तसेच विविध सरकारी कार्यक्रम आणि योजनांबद्दल माहिती एकत्र करण्यात मदत होते. माझ्या मते, हे प्रकाशन एका पुस्तकाच्या स्वरूपात सर्वांसाठी उपलब्ध झाले तर खूप छान होईल.

**kaluvakavyalu@gmail.com**

## स्पर्धा परीक्षांसाठी महत्त्वपूर्ण

न्यू इंडिया समाचार पाक्षिकामधून महत्त्वाची माहिती मिळते. तसेच स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी यातील बातम्या उपयुक्त आहेत. यामध्ये प्रकाशित होणाऱ्या सर्व बातम्या माहितीने परिपूर्ण असतात. मला 'व्यक्तिमत्व' मालिकेत सादर केल्या जाणाऱ्या नायकांच्या कथा आणि त्यांच्या योगदानासंबंधी माहिती सर्वात महत्त्वाची वाटते

**prof.prema@gmail.com**

## ...शिक्षक आणि विद्यार्थी दोघांनाही मिळत आहे ताजी माहिती

न्यू इंडिया समाचार पाक्षिकाच्या माध्यमातून आपल्याला देशातील आणि परदेशातील विविध घडामोडींची माहिती मिळते.यामुळे विविध स्पर्धा परीक्षांची तयारी करण्यास मदत होते.एक शिक्षक म्हणून, यामुळे स्वतःला अद्ययावत ठेवण्यास मदत होते. आम्ही आमच्या विद्यार्थ्यांना ते वाचण्यासाठी प्रोत्साहित करतो. तेसुद्धा प्रत्येक अंकाची आतुरतेने वाट पाहतात. न्यू इंडिया समाचार पाक्षिकाच्या संपूर्ण टीमला धन्यवाद.

**धनंजय कुमार यादव**

**dhananjaybhu07@gmail.com**

## प्रत्येक अंकात काही ना काही नवीन शिकण्यासारखे

न्यू इंडिया समाचार पाक्षिकाचा प्रत्येक अंक म्हणजे काहीतरी नवीन शिकण्यासारखे आहे. प्रत्येक अंकात भारत सरकारच्या योजनांविषयी माहिती असते. या पाक्षिकाच्या माध्यमातून मी देशात सुरू असलेल्या विकासकामांबाबत जाणून घेऊ शकत आहे. देशभक्ती असो किंवा निसर्गाशी असलेले नाते, प्रत्येक अंकात याबाबत काही ना काही नवीन असते.

**sjknews11@gmail.com**

## सर्व क्षेत्रांच्या विकासाबाबत अचूक माहिती

मी न्यू इंडिया समाचार पाक्षिक डिजिटल स्वरूपात वाचतो. प्रत्येक लेख मी काळजीपूर्वक वाचतो. प्रमुख वृत्तपत्रांच्या तुलनेत, या पाक्षिकात आपल्या वाचकांसाठी प्रकल्प, पायाभूत सुविधा, असंघटित क्षेत्रासाठी सामाजिक सुरक्षा इत्यादींबद्दल सविस्तर माहिती दिली जाते. मला हे खूप छान वाटते. यामुळे चालू घडामोडींविषयी मी बराच अवगत राहतो.

**sourabh.iimc@gmail.com**

पत्रव्यवहार आणि ईमेलसाठी पत्ता: खोली क्रमांक 1077,सूचना भवन, सीजीओ कॉम्प्लेक्स, नवी दिल्ली- 110003

**ईमेल- response-nis@pib.gov.in**




# पीएम किसान सम्मान निधी

## 22 वा हप्ता जारी : 7 वर्षांमध्ये 4.27 लाख कोटी रुपये शेतकऱ्यांच्या खात्यात पोहचले

मागील 11 वर्षांपासून देशातील शेतकऱ्यांना मजबूत सुरक्षा कवच देण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकार केंद्र सरकार निरंतर काम करत आहे. एमएसपी, स्वस्त कर्ज, पीक विमा, आंतरराष्ट्रीय संकट काळात शेती-शेतकऱ्यांवर परिणाम होऊ नये यासाठी काम केले जात आहे. मागील 10 वर्षांमध्ये शेतकऱ्यांना किमान हमी भाव ( एमएसपी) म्हणून 20 लाख कोटी रुपयांहून अधिक रक्कम मिळाली आहे. शेतकऱ्यांना आधार देण्यासाठी याच अनुषंगाने 13 मार्च रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पीएम किसान सम्मान निधीचा 22वा हप्ता म्हणून 18,640 कोटी रुपयांहून अधिक रक्कम 9.32 कोटी शेतकऱ्यांच्या खात्यात थेट हस्तांतरित केली. 22व्या हप्त्यात ज्या शेतकऱ्यांना रक्कम देण्यात आली, त्यामध्ये 2.15 कोटी महिला लाभार्थ्यांचाही समावेश आहे. जगातील सर्वात मोठी डीबीटी योजना बनलेल्या पीएम किसान सम्मान निधी योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना 4.27 लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कम हस्तांतरित करण्यात आली आहे. या योजनेत प्रत्येक पात्र शेतकरी कुटुंबाला दरवर्षी 6,000 रुपयांचे सहाय्य तीन समान हप्त्यांमध्ये दिले जाते. पंतप्रधान मोदी म्हणाले, "आज, सम्मान निधी योजना देशातील छोट्या शेतकऱ्यांसाठी सामाजिक सुरक्षेचे माध्यम बनली आहे."

## जनगणना-2027 चा शुभंकर 'प्रगती' महिला आणि 'विकास' पुरुषचे अनावरण

दोन टप्प्यांमध्ये होणाऱ्या जगातील सर्वात मोठी जनगणना-2027 साठी चार डिजिटल साधनांचा शुभारंभ तसेच शुभंकरचे अनावरण केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शाह यांच्या हस्ते झाले. शुभंकर 'प्रगती' आणि 'विकास' यांचे एक मैत्रीपूर्ण आणि नैसर्गिक प्रतीक म्हणून सादर करण्यात आले आहे. तसेच, हा शुभंकर 2047 पर्यंत भारताला एक विकसित राष्ट्र बनवण्याचा संकल्प पूर्ण करण्यामध्ये महिला आणि पुरुषांच्या समान सहभागाचे प्रतीक देखील आहे. पहिल्यांदाच जनगणना डिजिटल पद्धतीने केली जाणार आहे. तसेच, पहिल्यांदाच स्व-गणना करण्याचा पर्यायही उपलब्ध करून दिला जात आहे. जनगणनेच्या पहिल्या टप्प्यात घरांची यादी आणि मोजणी एक एप्रिल 2026 ते 30 सप्टेंबर 2026 दरम्यान आणि दुसऱ्या टप्प्यात लोकसंख्या गणना फेब्रुवारी 2027 मध्ये संपूर्ण भारतात केली जाईल.



## नोएडा आंतरराष्ट्रीय विमानतळाला मिळाला परवाना

नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने यमुना इंटरनॅशनल एअरपोर्ट प्रायव्हेट लिमिटेडला उत्तर प्रदेशातील गौतम बुद्ध नगरच्या जेवर येथे स्थित नोएडा आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी 'विमानतळ परवाना' प्रदान केला आहे. या विमानतळाला सार्वजनिक वापराच्या श्रेणीअंतर्गत, सर्व प्रकारच्या हवामानात पूर्ण 24 तास कार्यरत राहण्याची परवानगी देण्यात आली आहे. या आंतरराष्ट्रीय विमानतळाचा विकास सार्वजनिक-खाजगी भागीदारी (पीपीपी ) मॉडेल अंतर्गत केला जात आहे. नोएडा आंतरराष्ट्रीय विमानतळाचा विकास चार टप्प्यांमध्ये मल्टी-मोडल कार्गो हब म्हणून केला जात आहे. पहिल्या टप्प्यात एक धावपट्टी आणि एक टर्मिनल बांधण्यात आले आहे. या टप्प्यात, विमानतळाची वार्षिक क्षमता अंदाजे 1 कोटी 20 लाख प्रवासी हाताळण्याची असेल. सर्व टप्पे पूर्ण झाल्यावर हा विमानतळ दरवर्षी सुमारे 7 कोटी प्रवाशांना हाताळण्यास सक्षम होईल. यामुळे हे राष्ट्रीय राजधानी क्षेत्र आणि पश्चिम उत्तर प्रदेशसाठी एक प्रमुख विमान वाहतूक केंद्र म्हणून उदयाला येईल.






# पद्म पुरस्कार-2027 साठी करा नामांकन

पद्म पुरस्कार -2027 साठी नामांकन प्रक्रिया सुरु झाली आहे. नामांकन करण्याची शेवटची तारीख 31 जुलै , 2026 आहे . पद्म पुरस्कारांसाठी नामांकन/शिफारसी केवळ राष्ट्रीय पुरस्कार पोर्टलवर ( https://awards.gov.in ) ऑनलाइन स्वीकारल्या जातील. सर्वोच्च नागरी पुरस्कारांपैकी एक असलेल्या पद्म पुरस्कारांमध्ये पद्मविभूषण, पद्मभूषण आणि पद्मश्री पुरस्कारांचा समावेश आहे. हा पुरस्कार कला, साहित्य आणि शिक्षण, क्रीडा, वैद्यक, समाजकार्य, विज्ञान आणि अभियांत्रिकी, सार्वजनिक व्यवहार, नागरी सेवा, व्यापार आणि उद्योग यांसारख्या क्षेत्रांमधील वैशिष्ट्यपूर्ण आणि अपवादात्मक कामगिरीसाठी दिला जातो. डॉक्टर आणि शास्त्रज्ञ वगळता, सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांमध्ये काम करणाऱ्या लोकांसह सरकारी कर्मचारी पद्म पुरस्कारांसाठी पात्र नाहीत. पद्म पुरस्कारांना 'जनतेचे पद्म' बनवण्यासाठी कटिबद्ध असलेल्या केंद्र सरकारने सर्व नागरिकांना स्व-नामांकनासह नामांकन/शिफारसी करण्याची विनंती केली आहे. या पुरस्कारांशी संबंधित माहिती गृह मंत्रालयाच्या वेबसाइटवर https://mha.gov.in आणि पद्म पुरस्कार पोर्टल https://padmaawards.gov.in वर देखील उपलब्ध आहे.

# देश सल्फ्यूरिक ॲसिडच्या बाबतीत बनणार स्वयंपूर्ण

केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शाह यांनी 6 मार्च रोजी ओदिशाच्या पारादीप येथे इफ्को सल्फ्यूरिक ॲसिड संयंत्र-III चे लोकार्पण केले. हा कारखाना सुरु झाल्यामुळे ,आगामी काळात इफ्को आणि कृभको मिळून संपूर्ण देशाला सल्फ्यूरिक ॲसिडच्या बाबतीत स्वयंपूर्ण बनवतील. ओदिशामध्ये गृह मंत्रालयातर्फे राष्ट्रीय न्यायवैद्यक शास्त्र विद्यापीठाचे भूमिपूजन आणि तात्पुरत्या कॅम्पसचे उद्‌घाटनही करण्यात आले. केंद्र सरकारच्या या उपक्रमांमुळे ओदिशा राज्यातील न्यायवैद्यक शास्त्राच्या विद्यार्थ्यांना पदवी प्राप्त करताच कायमस्वरूपी नोकरी मिळवून देणाऱ्या अभ्यासक्रमांच्या माध्यमातून अनेक संधी उपलब्ध होतील. गृहमंत्र्यांनी एकाच दिवशी गृह मंत्रालयाच्या 3, सहकार मंत्रालयाच्या 4 आणि ओदिशा सरकारच्या 173 योजनांचे लोकार्पण व पायाभरणी केली.



# सुजलम गाव आयडीचा प्रारंभ

केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांनी सुजलम गाव आयडीचा प्रारंभ केला. या अनोख्या आयडीमुळे ग्रामीण पाईपलाईनद्वारे होणाऱ्या पाणीपुरवठ्याचे डिजिटल मॅपिंग केले जाईल.देशात प्रथमच प्रत्येक ग्रामीण पेयजल योजनेला एक डिजिटल ओळख दिली जात आहे; आतापर्यंत राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये 1.64 लाख सुजलम गाव आयडी तयार करण्यात आले आहेत. त्यांना 67 हजार सुजलम भारत आयडींशी जोडण्यात आले आहे. हा ग्रामीण जल सेवा वितरणाचा एक व्यापक डिजिटल उपक्रम आहे. यामुळे पारदर्शकता आणि देखरेख प्रणाली मजबूत होण्यास मदत होईल. केंद्रीय मंत्रिमंडळाने डिसेंबर 2028 पर्यंत जल जीवन मिशनच्या दुसऱ्या टप्प्याच्या विस्ताराला मंजुरी दिली आहे आणि यासाठीची तरतूद वाढवून 8.69 लाख कोटी रुपये करण्यात आली आहे. ▪





**भीम जन्मभूमी**
महू, मध्य प्रदेश



**शिक्षण भूमी**
आंबेडकर स्मारक, लंडन



**महापरिनिर्वाण भूमी**
अलिपूर रोड, नवी दिल्ली





**दीक्षा भूमी**
नागपूर, महाराष्ट्र



**चैत्यभूमी**
मुंबई, महाराष्ट्र

# पंचतीर्थ

## एका महान व्यक्तिमत्वाला कृतज्ञ राष्ट्र वंदन करते

**बाबासाहेब डॉ भीमराव आंबेडकर यांची तत्वे आणि आदर्श स्वावलंबी व विकसित भारताच्या निर्मितीला बळ आणि गती देणार आहेत... पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या शब्दात 14 एप्रिल रोजी बाबासाहेबांच्या 136 व्या जयंतीनिमित्त कृतज्ञ राष्ट्र त्यांना वंदन करीत आहे...**

“बाबासाहेब मानवतेचे पुरस्कर्ते होते. त्यांनी सर्व प्रकारच्या अमानुषतेला नाकारले, त्याचा समूळ नायनाट करण्यासाठी प्रयत्न केले तसेच ते सर्व काही घटनात्मक मार्गाने करित असत. बाबासाहेबांनी आपल्याला कोणता संदेश दिला. त्यांनी समाजाला फक्त एकच गोष्ट सांगितली. बंधुंनो शिक्षित व्हाआणि एकदा तुम्ही सुशिक्षित झालात की तुम्ही जगाच्या नजरेला नजर भिडवून थेट संवाद साधू शकाल. त्यांनी दिलेला दुसरा मंत्र होता संघटित होण्याचा तिसरा संदेश होता मानवतेच्या बाजूने लढण्याचा अमानुष गोष्टीविरुद्ध आवाज उठवा. हे तीन मंत्र आपल्याला आजही प्रेरणा देत आहेत. आपल्याला सामर्थ्य देत राहतील. ज्या भावनेने बाबासाहेब आंबेडकरांनी आपले कार्य केले ती भावना पूर्णपणे सच्ची राष्ट्रनिष्ठा आणि सामाजिक आशयाने परिपूर्ण होती. म्हणून हाच आपला संकल्प आहे. दलित असो, शोषित असो, वंचित असो, गरीब असो, आदिवासी असेल, गावकरी असो, झोपडपट्टीत राहणारे असोत किंवा शिक्षणाच्या अभावामुळे त्रस्त असो, त्या सर्वांसाठी जर काही करण्याची गरज असेल तर बाबासाहेब आंबेडकर हे आपल्यासाठी सदैव प्रेरणास्थानी आहेत.

सरकारने बाबासाहेबांचे योगदानाला जगासमोर ठळकपणे अधोरेखित केलेआहे. भारतात आणि परदेशात बाबासाहेब जिथे जिथे राहिले त्या ठिकाणांना आपण पंचतीर्थ म्हणून विकसित केले आहे त्यांचे जन्मस्थान महू, नागपूरमधील दीक्षाभूमी, मुंबईतील चैत्यभूमी, दिल्लीतील ते ठिकाण जिथे त्यांनी अखेरचे दिवस व्यतित केले आणि लंडनमधील आंबेडकर स्मृतीस्थळ ही पंचतीर्थे येणाऱ्या पिढ्यांना प्रेरणा देत राहतील. आपल्या सर्व देशवासीयांच्या वतीने आम्ही भारतरत्न पूजनीय बाबासाहेबांना त्यांच्या जयंतीनिमित्त कोटी कोटी आदरांजली अर्पण करतो. त्यांच्या प्रेरणेमुळेच देश सामाजिक न्यायाचे आपले स्वप्न साकार करण्यासाठी समर्पितपणे कार्यरत आहे. त्यांची तत्वे आणि आदर्श स्वावलंबी व विकसित भारताच्या निर्मितीला बळ आणि गती देतील.”



# ज्यांनी 1971 च्या युद्धात पाकिस्तानला दिले सडेतोड प्रत्युत्तर

जन्म : 5 एप्रिल, 1908
मृत्यू : 6 जुलै, 1986

*भारतीय राजकारणातील एक महान व्यक्तिमत्व असलेले बाबू जगजीवन राम यांनी आयुष्यभर एका सर्व समावेशक आणि समतावादी समाजासाठी लढा दिला. अन्न आणि कृषी मंत्री म्हणून भारताच्या हरित क्रांतीच्या यशाचे श्रेय त्यांना दिले जाते तर संरक्षण मंत्री म्हणून त्यांनी 1971 च्या युद्धात भारताच्या ऐतिहासिक विजयात महत्त्वाची भूमिका बजावली ज्यामुळे बांगलादेशची निर्मिती झाली. सामाजिक न्यायासाठी असलेली त्यांची कटिबद्धता आजही देशवासीयांना प्रेरणा देत आहे...*

महान स्वातंत्र्य सैनिक आणि सामाजिक न्यायाचे प्रणेते बाबू जगजीवन राम यांचा जन्म 5 एप्रिल,1908 रोजी बिहार मधील भोजपूर येथे झाला. जगजीवन राम यांना त्यांच्या धार्मिक वृत्तीचे असलेल्या वडिलांकडून मानवी मूल्ये आणि समजूतदारपणाचा वारसा मिळाला. प्रेमाने आणि आदराने बाबूजी म्हणून ज्ञात असणारे जगजीवन राम यांनी दलितांच्या उन्नतीसाठी अथकपणे लढा दिला. महात्मा गांधी यांना आदर्श मानणाऱ्या बाबू जगजीवन राम यांना 10 डिसेंबर, 1940 रोजी ताब्यात घेण्यात आले तसेच भारत छोडो आंदोलनातील सक्रिय सहभागामुळे 19 ऑगस्ट 1942 रोजी पुन्हा अटक करण्यात आली. तुरुंगातून सुटल्यानंतर 1946 मध्ये ते केंद्रातील हंगामी सरकारमधील सर्वात तरुण मंत्री बनले. ते भारताच्या घटना सभेचे सदस्यही होते.

त्याआधी, 1936 मध्ये वयाच्या 28 व्या वर्षीच ते बिहार विधान परिषदेचे नामनिर्देशित सदस्य म्हणून आमदार होत पदभार स्विकारला होता. त्यांनी 33 वर्षे एवढ्या सर्वाधिक कालावधीसाठी केंद्रीय मंत्रिमंडळ सदस्य म्हणून कामकाज केले आणि अनेक महत्त्वाची खाती सांभाळली. देशाचे उपपंतप्रधान म्हणूनही त्यांनी काम केले आणि अनोख्या सुधारणा घडवून आणल्या. अन्न आणि कृषी मंत्री म्हणून भारतातील 'हरित क्रांती'च्या यशाचे श्रेय त्यांना दिले जाते. संरक्षण मंत्री म्हणून 1971 च्या युद्धात भारताच्या ऐतिहासिक विजयात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. यानंतरच, बांगलादेशची निर्मिती झाली. एक प्रशासक म्हणून भारतासाठी त्यांची सेवा अतुलनीय होती. या महान राष्ट्रवादी नेत्याचे 6 जुलै 1986 रोजी निधन झाले.

5 एप्रिल 2025 रोजी माजी उपपंतप्रधान बाबू जगजीवन राम यांच्या जयंतीनिमित्त त्यांना आदरांजली वाहताना पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले होते की "वंचित आणि शोषितांच्या हक्कांसाठीचा त्यांचा आयुष्यभराचा संघर्ष नेहमीच प्रेरणा देत राहील. बाबू जगजीवन राम यांनी आपले जीवन गरिबांच्या कल्याणासाठी समर्पित केले होते. अनेक वर्ष राष्ट्रसेवेत त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य खर्ची केले. बाबू जगजीवन राम यांना दोन गोष्टी हव्या होत्या, एक म्हणजे बलवान भारत आणि दुसरे लोकशाही आधारित भारत. आपल्या देशाने जेव्हा पाकिस्तानला सडेतोड उत्तर दिले तेव्हा बाबूजी भारताचे संरक्षण मंत्री होते. आणीबाणी विरोधात आवाज उठवणारे ते पहिले काँग्रेस नेते होते. त्या काळात जेव्हा तत्कालीन पंतप्रधानांबद्दल लोकांच्या मनात भिती उत्पन्न झाली होती, जेव्हा लोकांना अटक केली जात होती, तेव्हा त्यांनी सांगितले होते की लोकांनी या संघर्षाच्या परिणामांबाबत अजिबात भय बाळगू नये."

विकासाच्या पुढील टप्प्यावर...

# अशक्य बाबी शक्य करत असलेला भारत

*दांडी यात्रा हा भारताच्या स्वातंत्र्य चळवळीतील एक महत्त्वाचा टप्पा होता... ज्याचे ध्येय होते - भारताचे स्वातंत्र्य. या सुवर्ण इतिहासातून प्रेरणा घेऊन भारताने गेल्या 11 वर्षात प्रगतीचा एक नवीन अध्याय लिहिला आहे. आणि आता विकसित भारताच्या ध्येयाने विकासाचा हा प्रवास पुढील स्तरावर नेला आहे. आय टी व्ही नेटवर्कच्या एन एक्स टी परिषदेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाच्या विकास प्रवासाची रूपरेषा मांडली ज्याद्वारे 2047 पर्यंत भारताला विकसित बनविण्याच्या संकल्पाच्या सिद्धीचे ध्येय पूर्ण केले जाईल..*

## गंतव्य स्थान... विकसित भारत

महात्मा गांधी यांनी 12 मार्च, 1930 रोजी साबरमती आश्रमातून दांडी यात्रेला सुरुवात केली होती. हा भारताच्या स्वातंत्र्य चळवळीतील एक महत्त्वाचा टप्पा होता कारण या यात्रेने देशाचा कानाकोपरा एकाच ध्येयपूर्तीसाठी एकत्र जोडला गेला आणि हे ध्येय होते भारताचे स्वातंत्र्य. आज या ऐतिहासिक यात्रेला जवळपास शंभर वर्षे पूर्ण झाल्यावर भारतीय एका नव्या प्रवासाला निघाले आहेत. हा प्रवास आहे विकसित भारताच्या दिशेने. आपले ध्येय आणि आपले गंतव्य स्थान एकच आहे एक - विकसित भारत.

## आव्हाने असतानाही पुढे वाटचाल करीत आहे राष्ट्र

21व्या शतकाचा काळ हा न भूतो न भविष्यती असा आहे. एकीकडे युद्धाची भीषणता आहे आणि पुरवठा साखळ्या पुन्हा विस्कळीत होत आहेत. संयुक्त राष्ट्रांसारख्या जागतिक संस्थांच्या प्रासंगिकतेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे आणि अशा या काळात प्रतिकूल परिस्थिती असूनही भारत पुढे वाटचाल करीत आहे. आव्हानांवर कशा प्रकारे मात केली जाते हा कोणत्याही देशाच्या विकासाचा एक प्रमुख पाया असतो. गेल्या काही वर्षात कोरोना विषाणू महामारीचे संकट, त्यानंतर रशिया-युक्रेन




## भारताशी जोडले गेलेच पाहिजे

अलीकडेच फिनलंडचे राष्ट्राध्यक्ष अलेक्झांडर स्टब यांनी भारताला भेट दिली. ते म्हणाले की जगाची दिशा आता ग्लोबल साउथ ठरवेल आणि ती दिशा ठरविणारी सर्वात मोठी ताकद असेल भारत.

त्याआधी कॅनडाचे पंतप्रधान मार्क कार्नी यांनीही म्हटले होते की पुढील तीन दशकात जगाचे आर्थिक गुरुत्वाकर्षण ज्या केंद्राच्या दिशेने सरकत आहे, त्याचे नाव आहे भारत.

फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युअल मॅक्रॉन यांचाही असा विश्वास आहे की जगातील सर्वात मोठ्या समस्या सोडवण्यासाठी भारत एक अपरिहार्य भागीदार बनला आहे. तंत्रज्ञान क्षेत्र आणि अर्थव्यवस्थेत आघाडीवर असलेल्या जागतिक नेत्यांच्या विधानांचे विश्लेषण केले असता एकच भावना दिसून येते, जर तुम्हाला भविष्याचा भाग व्हायचे असेल तर तुम्हाला भारताशी जोडले गेलेच पाहिजे, तुम्ही भारताशी संबंधित असलाच पाहिजेत.

पंतप्रधानांचा संपूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी क्यू आर कोड स्कॅन करा.



धुमश्चक्रीचे संकट आणि आता आणखी एक मोठे युद्ध युद्ध सुरू आहे. या युद्धाने संपूर्ण जगाला एका मोठ्या ऊर्जा संकटाच्या खाईत लोटले आहे. संकट काळ हा एका अर्थाने संपूर्ण राष्ट्राची सत्वपरीक्षाच असते. भारत सरकार देखील या संकटाचा सामना करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करीत आहे. सरकार विविध स्तरांवर प्रयत्न करीत आहे. गेल्या काही दिवसांत अनेक देशातील सर्वोच्च नेत्यांशी याबाबत चर्चा झाली आहे. पुरवठा साखळीतील अडथळे दूर करण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न सुरू आहेत. परिस्थिती शांतपणे आणि संयमाने हाताळली पाहिजे. जनतेचा विश्वास वाढवून आणि जनतेला शिक्षित करून आपण पुढे जायला हवे आणि यात प्रत्येकाची काही ना काही भूमिका असते.

## सुधारणांच्या पुढील अध्यायाकडे...

आज भारत पुढील पिढीतील सुधारणा घडवून आणत आहे, तो सुधारणांच्या वेगावर स्वार झाला आहे. भारतात एकेकाळी अनेक कामे आणि निर्णय जवळजवळ अशक्य मानले जात होते, आज भारत ते निर्णय देखील घेत आहे.

- एकेकाळी असे म्हटले जायचे की कलम 370 हटवणे अशक्य आहे, जम्मू आणि काश्मीरमध्ये कलम 370 ची भिंत कोसळली आहे.
- देश देशात बँकिंग प्रणालीशी जोडले जाणे एकेकाळी अशक्य वाटायचे, आज 50 कोटींहून अधिक जनधन खाती उघडण्यात आली आहेत.
- तिहेरी तलाक संपवणे अशक्य वाटत होते, आज मुस्लिम भगिनींना या अन्यायातून मुक्ती मिळाली आहे.
- लोकसभा आणि विधानसभेत महिलांसाठी 33% आरक्षण सुद्धा अशक्य वाटत होते. आज त्यासाठी कायदा करण्यात आला आहे.
- आज चंद्र मोहीम, सेमीकंडक्टर मिशन, क्वॉन्टम मिशन हे सर्व भारताला पुढील पिढीच्या तंत्रज्ञानाकडे घेऊन जात आहेत.

## ऊर्जा क्षेत्रात स्वावलंबित्व




- 11 वर्षात सिलिंडर भरायची क्षमता दुप्पट झाली. वितरण केंद्रांची संख्या 13 हजार वरून 25 हजार पर्यंत वाढली.
- 2014 मध्ये 4 एलएनजी टर्मिनल होते, त्यांची संख्या दुप्पट झाली आहे.
- गॅस पाईपलाईन सुमारे 3,500 किलोमीटर लांब होती, आता तिचा विस्तार होऊन ती 10 हजार किलोमीटर करण्यात आली आहे.
- सध्या 60 टक्के एलपीजी परदेशातून येतो त्यामुळे देशाच्या प्रमुख बंदरातील आयात टर्मिनलची क्षमता वाढवण्यात आली आहे.

## पाईप गॅस सुविधा......


- 2014 पूर्वी देशात केवळ 25-26 लाख घरांमध्ये पीएनजीची सुविधा होती, आज हा आकडा सव्वा कोटींहून अधिक आहे.
- 2014 मध्ये देशात 10 लाख सीएनजी वाहने होती आज त्यांची संख्या 70 लाखांपेक्षा जास्त आहे
- गेल्या दशकात देशातील 600 हून अधिक जिल्ह्यांमध्ये शहरी गॅस वितरण नेटवर्क स्थापित करण्यात आले.



# पेट्रोलियम मधील इथेनॉल आणि साठ्याची क्षमता

- वर्ष 2014 पूर्वी भारताची युद्धजन्य राखीव क्षमता नगण्य अशी होती, ती आज 50 लाख टनांपेक्षा जास्त आहे. ही क्षमता आणखी वाढवण्याचे काम सुरू आहे.
- भारत आज जगातील सर्वात मोठ्या शुद्धीकरण प्रकल्पांपैकी एक आहे. ज्याच्य शुद्धीकरण क्षमतेत गेल्या दशकात वार्षिक 40 दशलक्ष टनांपेक्षा जास्त वाढ झाली आहे.
- पेट्रोलियम वरील अवलंबित्व कमी करण्यासाठी इथेनॉल आणि जैवइंधनांच्या वापरावर भर देण्यात आला आहे.

देशातील इथेनॉल मिश्रण क्षमता




- भारताने जर हे केले नसते तर गेल्या 11 वर्षात देशाला सुमारे 18 कोटी बॅरल अतिरिक्त तेल परदेशातून खरेदी करावे लागले असते

सुमारे **4.5** इथेनॉल उत्पादन क्षमतेमुळे आज वार्षिक कोटी बॅरल तेल कमी आयात करावे लागत आहे.

सुमारे **1.5** केवळ यामुळे देशाने लाख कोटी रुपयांची बचत केली आहे.



## रेल्वे मार्गांचे विद्युतीकरण

रेल्वे ब्रॉडगेज नेटवर्कचे विद्युतीकरण




- केवळ 2024 25 या वर्षातच भारतीय रेल्वेने सुमारे 180 कोटी लिटर डिझेलची बचत केली आहे.
- जर विद्युतीकरण झाले नसते तर एवढ्या डिझेलच्या उत्पादनासाठी दरवर्षी अतिरिक्त कच्चे तेल आयात करावे लागले असते.

## ...जेणेकरून युद्धाचा भारतावर कोणताही प्रतिकूल परिणाम होणार नाही

- जेव्हा रशिया युक्रेन संकट वाढले तेव्हा खतांच्या किमती गगनाला भिडल्या. असे असूनही आंतरराष्ट्रीय बाजारात 3,000 रुपयांना मिळणारी युरियाची गोणी शेतकऱ्यांना केवळ 300 रुपयांत उपलब्ध केली गेली.
- यावेळीही युद्धाचा नागरिकांच्या जीवनावर कमीत कमी परिणाम व्हावा यासाठी देश सर्वतोपरी प्रयत्न करेल.

## महत्त्वाकांक्षी जिल्ह्यांमध्ये विशेष मोहीम

सरकारने विकासाच्या शर्यतीत मागे राहिलेल्या भागांमध्ये प्रशासकीय प्राधान्यक्रम समाविष्ट केले आहेत. आज या क्षेत्रात गृहनिर्माण, रस्ते, शाळा आणि रुग्णालय यांसारख्या पायाभूत सुविधांच्या बांधकामासाठी महत्त्वाकांक्षी जिल्हा योजना, महत्त्वाकांक्षी ब्लॉक योजना आणि पीएम जनमन योजना यांसारख्या विशेष मोहिमा राबवल्या जात आहेत.

## नक्षलवाद

वर्ष 2013 मध्ये 180 हून अधिक जिल्हे माओवादी दहशतवादाच्या सावटाखाली होते. आज ही संख्या एकेरी आकडेवारीत सीमित झाली आहे. याचा परिणाम असा दिसून येत आहे की, एकेकाळी भीतीच्या छायेत वावरणाऱ्या भागांमध्ये आता विकासाची नवी ऊर्जा अनुभवली जात आहे.

## नवीकरणीय ऊर्जा 40 पटीने वाढली

- आज देशाच्या एकूण ऊर्जा उत्पादन क्षमतेपैकी निम्मी क्षमता नवीकरणीय स्रोतांमधून प्राप्त होते

नवीकरणीय क्षमतेने **250** गिगावॅटचा टप्पा ओलांडला आहे




- घरगुती वापरासाठी गॅस व्यतिरिक्त वीज अधिकाधिक उपयुक्त बनवण्यासाठी पंतप्रधान सूर्य घर मोफत वीज योजना लागू करण्यात आली. आतापर्यंत अंदाजे 30 लाख कुटुंबीयांनी घराच्या छतावर सौर पॅनल बसवली आहेत.
- गोवर्धन योजनेने दाबाखालील जैववायूच्या पुनर्वापरावर लक्ष केंद्रित केले आहे. आतापर्यंत देशात 100 हून अधिक प्रकल्प कार्यान्वित करण्यात आले असून 600 हून अधिक प्रकल्पांवर काम सुरू आहे.



### स्वप्ने साकार करीत आहे भारत...

आजचा भारत केवळ स्वप्ने पाहत नाही तर ती सत्यात उतरवित आहे. म्हणूनच जग आज म्हणत आहे की भारत केवळ प्रगती करत नाही तर पुढील स्तरावर झेप घेत आहे. कोरोना काळात आपण पाहिले आहे की जेव्हा सर्वजण एकत्र काम करतात तेव्हा संकटावर मात करण्याची क्षमता अनेक पटीने वाढते. आज देशासमोर आणखी एक आव्हान आहे आणि म्हणूनच राष्ट्रीय हिताला सर्वोच्च प्राधान्य देत आपण सर्वांनी एकत्रित प्रयत्न करून आपली कर्तव्य पार पाडली पाहिजेत.

### प्रगतीचा पुढील टप्पा...

आज देश पुढील पिढीच्या डिजिटल पायाभूत सुविधांच्या दिशेने वाटचाल करीत आहे. यू पी आय ने डिजिटल प्रदान एका नव्या टप्प्यावर पोहोचवले आहे. भारत आज जगातील सर्वात वेगाने रिअल टाईम डिजिटल पेमेंट करणारा देश बनला आहे. भारत आज ज्या वतीने प्रगती करीत आहे त्या प्रगतीच्या आड कोणीही येणे आता अशक्य आहे. 140 कोटी भारतीयांच्या आकांक्षा आज पुढील स्तरावर पोहोचल्या आहेत. मला माहित आहे की जेव्हा एक स्वप्न पूर्ण होते तेव्हा नवीन स्वप्न आणि नवीन आकांक्षा जन्म घेतात. आता केवळ 140 कोटी भारतीयांच्या आशा आणि आकांक्षा पूर्ण होतील. भारत प्रत्येक क्षेत्रात स्वावलंबी होईल. भारत कोणत्याही परिस्थितीत विकास साधेल. ▪

मुखपृष्ठ कथा

**राष्ट्रीय सागरी दिन**

विशेष



# भारताच्या सागरी सामर्थ्याचे पुनरुज्जीवन



*एकेकाळी भारत जगातील सर्वात समृद्ध आणि बलवान देशांपैकी एक मानला जात असे आणि त्याच्या या समृद्धीचा एक मोठा आधार म्हणजे त्याची भक्कम सागरी शक्ती होती. मात्र, स्वातंत्र्यानंतर बराच काळ या क्षेत्रातील अफाट संधींकडे अपेक्षित लक्ष दिले गेले नाही. आज बदलत्या जागतिक परिस्थितीत 'नवा भारत' आपल्या गौरवशाली सागरी इतिहासातून प्रेरणा घेऊन पुढे जात आहे. आधुनिक बंदरांचा विकास, उत्तम सागरी दळणवळण आणि अत्याधुनिक पायाभूत सुविधांच्या निर्मितीद्वारे देश सागरी क्षेत्रात नवी ऊर्जा चेतवत आहे. या माध्यमातून भारत व्यापार आणि औद्योगिक विकासाला गती तर देतोच, सोबत राष्ट्रीय सुरक्षा, जागतिक स्पर्धात्मकता आणि धोरणात्मक आत्मनिर्भरतेसाठी (स्वावलंबन) एक मजबूत पाया देखील रचत आहे....*

*राष्ट्रीय सागरी दिनाच्या (5 एप्रिल) निमित्ताने, गेल्या 11 वर्षांत भारताने जगातील प्रमुख सागरी शक्तींमध्ये स्थान मिळवण्याच्या दिशेने कशी महत्त्वपूर्ण पावले उचलली आहेत, हे जाणून घेऊया. या प्रयत्नांमुळे 2047 पर्यंत सागरी क्षेत्रात सुमारे 8 ट्रिलियन (8 लाख कोटी) रुपयांच्या गुंतवणुकीला गती मिळण्याची आणि अंदाजे दीड कोटी नवीन रोजगार निर्माण होण्याची आशा आहे. आपल्या सागरी अमृत काळ संकल्पा सह विकसित भारताच्या ध्येयाकडे नवा भारत वेगाने वाटचाल करत आहे.*

भारताच्या सागरी सामर्थ्याचा इतिहास सुवर्णमय असून तो हजारो वर्षे जुना आहे. शेकडो वर्षांपूर्वी जेव्हा आजच्यासारखे तंत्रज्ञान नव्हते, जेव्हा अशी साधने नव्हती, तेव्हा त्या काळात समुद्र भेदून भारताने सिंधुदुर्गसारखे कित्येक किल्ले बांधले. भारताला 11 हजार किलोमीटरपेक्षा जास्त लांबीची किनारपट्टी आणि मोठ्या सागरी सीमा लाभल्या असून, तो प्रमुख जागतिक व्यापारी मार्गावर वसलेला आहे. यामुळे भारतात बंदराभिमुख आर्थिक विकासाच्या अफाट संधी निर्माण होतात. याच कारणामुळे आता नवा भारत सुवर्ण इतिहासाच्या पुनर्जागरणाचा नवा अध्याय लिहित आहे. सागरी शक्ती आणि सामर्थ्य किती महत्त्वाचे आहे, याचे वर्णन भारतीय धर्मग्रंथांपासून आधुनिक काळातील साहित्यापर्यंत आढळते. हेच लक्षात घेऊन नवा भारत सागरी पायाभूत सुविधांमध्ये प्रगतीचे नवे मैलाचे दगड प्रस्थापित करत आहे.

सागरी पायाभूत सुविधांची संपूर्ण परिसंस्था मजबूत करण्यासाठी सातत्याने काम केले जात आहे. गेल्या एका दशकात भारतातील मोठ्या बंदरांची क्षमता दुपटीने वाढली आहे. बंदर दळणवळण अधिक मजबूत करण्यासाठी हजारो किलोमीटरचे नवीन रस्ते बांधले गेले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदींचे 'पोर्ट फॉर प्रोस्पॅरिटी' (समृद्धीसाठी बंदरे) आणि 'पोर्ट फॉर प्रोग्रेस' (प्रगतीसाठी बंदरे) हे संकल्प, वास्तवात बदल घडवून आणत आहेत आणि कामकाजात 'पोर्ट फॉर प्रोडक्टिव्हिटी' (उत्पादकतेसाठी बंदरे) हा मंत्रही पुढे नेला आहे. भारत आपल्या 'कोस्टल शिपिंग मोड'चे (किनारी जलवाहतूक) देखील आधुनिकीकरण करत आहे. भारतातील 'इनलँड वॉटरवेज'च्या (अंतर्गत जलमार्ग) विकासामध्येही मोठा बदल होत आहे. जेव्हा जेव्हा भारताचे सागरी सामर्थ्य भक्कम राहिले आहे, तेव्हा तेव्हा देश आणि जगाला त्याचा मोठा लाभ झाला आहे, याला इतिहास साक्ष आहे. याच विचाराने हे क्षेत्र सशक्त करण्यासाठी गेल्या एका दशकापासून नियोजनबद्ध पद्धतीने काम सुरू आहे.

**पश्चिम आशियात सुरु असलेल्या युद्धामुळे बदलती सागरी परिस्थिती पाहता, बंदरे, जहाजनिर्मिती आणि जलमार्ग मंत्रालयाने देखरेख आणि सज्जता अधिक बळकट केली आहे. भारतीय खलाशी आणि भारतीय जहाजांची सुरक्षा सुनिश्चित करणे तसेच सागरी व्यापार विनाअडथळा सुरु ठेवणे, हा याचा मुख्य उद्देश आहे.**



## समृद्ध इतिहास होतोय पुनरुज्जीवित

भारताची सागरी परंपरा अत्यंत समृद्ध राहिली आहे. प्राचीन काळापासून भारत, जहाजनिर्मिती आणि किनारी व्यापारासाठी ओळखला जातो. ही, चोल आणि मराठा यांसारख्या प्रबळ राजवटींची भूमी राहिली आहे. यांच्या प्रबळ नौदल सामर्थ्याने, व्यापक व्यापाराने आणि धोरणात्मक कौशल्याने देशाची समृद्धी आणि शक्ती वाढवण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. समुद्र कसे संधींचे सेतू म्हणून काम करू शकतात, हे त्यांच्या दूरदृष्टीने दाखवून दिले. बराच काळ भारताचे सागरी क्षेत्र, जुने (कालबाह्य) कायदे आणि अपुरी/मर्यादित क्षमता यांमुळे नीट विकसित होऊ शकले नाही; त्या अडचणींशी ते सतत सामना करत होते. अशा स्थितीत, ही परिस्थिती बदलण्यासाठी 2014 पासून एका विशिष्ट संकल्पासह पुढाकार घेण्यात आला आणि गेल्या 11 वर्षांत या क्षेत्रात मोठे बदल झाले आहेत. आज भारताचे सागरी क्षेत्र आधुनिक, तसेच जागतिक विश्वास आणि राष्ट्रीय अभिमानाचे प्रतीक बनले आहे. भारताने नैसर्गिकरित्या या क्षेत्राचे नेतृत्व केले आहे. भारतीय किनाऱ्यांवर संस्कृती बहरल्या. हजारो वर्षे भारतीय बंदरे महत्त्वाची व्यापार केंद्रे राहिली आहेत. या किनाऱ्यांनी भारताला जगाशी जोडले आहे. भारताच्या या समृद्धीचा एक मोठा आधार म्हणजे भारताचे सागरी सामर्थ्य होते. या सामर्थ्याचे एक उदाहरण, सागरी व्यापार आणि सागरी सामर्थ्य एका नव्या उंचीवर नेऊन ठेवणारे स्वतः छत्रपती शिवाजी महाराज आहेत. त्यांनी नवी धोरणे आखली, देशाच्या प्रगतीसाठी निर्णय घेतले. एकेकाळी भारताची सागरी ताकद इतकी प्रबळ होती की, दर्यासारंग कान्होजी आंग्रे एकहाती संपूर्ण 'ईस्ट इंडिया कंपनी'ला पुरुन उरले होते. परंतु, स्वातंत्र्यानंतर त्या वारशाकडे दुर्लक्ष करण्यात आले. औद्योगिक विकासापासून व्यापारापर्यंत, भारत मागे पडत गेला. त्या काळी सागरी ताकद म्हणून भारताची गणना, जहाजनिर्मितीचे जगातील सर्वात मोठे केंद्र म्हणून होत असे. भारताच्या किनारी राज्यांमध्ये उभारलेली जहाजे, देश आणि जगाच्या व्यापाराला गती देत असत. इतकेच काय, सहा दशकांपूर्वीपर्यंत जग, भारतात उभारलेल्या जहाजांचा वापर करत असे. त्या काळात भारताची 40 टक्क्यांहून अधिक आयात-निर्यात देशातच तयार झालेल्या जहाजांतून होत असे. मात्र गेल्या काही दशकांमध्ये देशाचे 'शिपिंग

*बंदराभिमुख विकासाबाबत 11 वर्षांपूर्वी जी उद्दिष्टे आम्ही निश्चित केली होती, त्यामध्ये भारत जबरदस्त यश मिळवत आहे. आम्ही देशात मोठ्या जहाजांसाठी मोठी बंदरे बांधत आहोत, 'सागरमाला' सारख्या योजनां अंतर्गत बंदरांची संपर्क आणि दळणवळण व्यवस्था वाढवत आहोत.*

**- नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

सेक्टर' (नौवहन क्षेत्र) उपेक्षेचे बळी ठरले. भारतात जहाजनिर्मितीवर भर देण्याऐवजी, परदेशी जहाजांना भाडे देणे अधिक सोयीचे मानले गेले. यामुळे भारतातील जहाजनिर्मितीची परिसंस्था ठप्प झाली आणि परदेशी जहाजांवर अवलंबून राहणे, अपरिहार्य बनले. याचा परिणाम असा झाला की, 5-6 दशकांपूर्वी जिथे 40 टक्के व्यापार भारतीय जहाजांमार्फत होत असे, ते प्रमाण घटून हा व्यापार केवळ 5 टक्क्यांवर आला. म्हणजेच, आपल्या 95 टक्के व्यापारासाठी आपण परदेशी जहाजांवर अवलंबून राहू लागलो.

हे आकडेवारीच्या स्वरूपात पाहा—या क्षेत्राला पुनरुज्जीवित करण्यासाठी गेल्या एका दशकात झालेल्या प्रयत्नां आधी, भारत दरवर्षी सुमारे 75 अब्ज डॉलर म्हणजेच जवळपास सहा लाख कोटी रुपये, परदेशी जहाज कंपन्यांना भाड्याच्या रूपात देत होता. म्हणजेच, आज भारताचा जेवढा संरक्षण विषयक खर्च आहे, जवळपास तितका पैसा केवळ भाड्यापोटी दिला जात होता. जर ही रक्कम आधीच भारताच्या जहाज उद्योगावर खर्च झाली असती, तर आज जग भारतीय जहाजांचाच वापर करत असते. देशाचा पैसा वाचला असता, ज्याचा वापर जनकल्याणाच्या इतर कामांसाठी होऊ शकला असता. नवंभारताने इतिहासातून धडा घेत आपली क्षमता आणि मान कशात आहे, हे ओळखले आहे. याचसोबत देश, सागरी पायाभूत सुविधांच्या विकासात सातत्याने नवे मैलाचे दगड प्रस्थापित करत आहे. म्हणजेच आज, सागरी क्षेत्र भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा बनले असून, देशाच्या एकूण व्यापारापैकी 95 टक्के (प्रमाणानुसार) आणि 70 टक्के (मूल्यानुसार) व्यापार, भारताच्या सागरीक्षेत्राद्वारे होतो. याच्या केंद्रस्थानी 'जहाजनिर्मिती' असून, तिला अनेकदा 'अवजड अभियांत्रिकीची जननी' म्हटले जाते. ही बाब, केवळ रोजगार आणि गुंतवणुकीत महत्त्वपूर्ण योगदान देत नाही, तर राष्ट्रीय सुरक्षा, धोरणात्मक स्वातंत्र्य, तसेच व्यापार आणि ऊर्जा पुरवठा साखळीच्या सक्षमीकरणालाही प्रोत्साहन देते.

*नौवहन क्षेत्रातील सुधारणा या एका अर्थाने गेल्या दशकातील आमच्या सुधारणांच्या प्रवासाचेच सातत्यरुप आहे. जर आपण गेल्या दहा-अकरा वर्षांकडे पाहिले, तर भारताच्या सागरी क्षेत्रात झालेला बदल ऐतिहासिक आहे.*

**- नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

जहाजनिर्मितीचे काम भारतात व्हावे आणि भारतातील लोकांना रोजगार मिळावा, यावर केंद्र सरकारने विशेष भर दिला आहे. या दृष्टिकोनातून कोट्यवधी रुपयांची गुंतवणूक झाली आहे. याचाच परिणाम म्हणून बहुतांश बंदरांची क्षमता पूर्वीच्या तुलनेत दुप्पट झाली असून, खाजगी गुंतवणूकही वाढली आहे. जहाजांना, बंदरात येऊन, मालाची चढउतार करुन, बंदरातून माघारी फिरण्यासाठी लागणाऱ्या एकूण वेळेत (टर्न अराउंड टाइम) घट झाली आहे. याचा लाभ उद्योग आणि व्यापाऱ्यांना मिळाल्याने त्यांचा खर्च कमी झाला आहे. गुजरातच्या लोथलमध्ये सापडलेले सिंधू संस्कृतीचे बंदर हा आज भारताचा खूप मोठा वारसा आहे.



# भारतीय सागरी क्षेत्र


*सागरी क्षेत्र हे भारताच्या बळकटीचे, स्थैर्याचे आणि सातत्याचे प्रतीक आहे. 11,098 किलोमीटर लांबीची किनारपट्टी, किनारपट्टी लाभलेली 13 राज्ये, सुमारे 1,300 बेटे आणि 23.7 लाख चौरस किलोमीटरचे 'विशिष्ट आर्थिक क्षेत्र', भारताला नैसर्गिकरित्या एक मोठी सागरी ताकद बनवतात.*

**11,098** किलोमीटर लांबीची किनारपट्टी

**13** किनारपट्टी लाभलेली राज्ये

**1,300** बेटे

**23.7** लाख चौरस किलोमीटरचे विशिष्ट आर्थिक क्षेत्र



## सागरी क्षेत्र म्हणजे काय ?

मेरीटाइम म्हणजे अर्थव्यवस्थेसाठी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या, समुद्राशी संबंधित उद्योग, मार्गक्रमण, व्यापार, जहाज निर्मिती आणि सागरी सुरक्षा या बाबी आहेत.

## समृद्ध इतिहास

भारताचा सागरी इतिहास सिंधू खोऱ्याच्या संस्कृतीतील लोथल या जगातील सर्वात जुन्या बंदराशी निगडीत आहे. येथून, मेसोपोटेमियाशी व्यापार चालत असे. लोथल येथे सापडलेले 'ड्राय डॉक' (सुकी गोदी- जहाज कामांसाठी पाण्याचा साठा आवश्यक नसलेली सुविधा) इसवी सन पूर्व 2400 सालातील आहे. जहाजांना आश्रय आणि त्यांच्या दुरुस्तीची सुविधा असलेले हे जगातील पहिलेच ठिकाण मानले जाते.





*भारताचा इतिहास हा आपल्या सागरी सामर्थ्याचा इतिहास आहे. शेकडो वर्षांपूर्वी जेव्हा असे तंत्रज्ञान नव्हते, अशी साधने नव्हती, तेव्हा त्या काळात समुद्र भेदून आपण सिंधुदुर्गासारखे कित्येक किल्ले बांधले. भारताचे सागरी सामर्थ्य हजारो वर्षे जुने आहे. गुजरातच्या लोथलमध्ये सापडलेले सिंधू संस्कृतीचे बंदर हा आज आपला खूप मोठा वारसा आहे.*

**– नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

एकेकाळी सुरतच्या बंदरावर 80 हून अधिक देशांची जहाजे नांगर टाकून उभी राहत असत. चोल साम्राज्याने भारताच्या याच सामर्थ्याच्या जोरावर आग्नेय (दक्षिण-पूर्व) आशियातील अनेक देशांपर्यंत आपला व्यापार विस्तारला होता. अशा परिस्थितीत जेव्हा परकीय शक्तींनी भारतावर आक्रमण केले, तेव्हा सर्वात आधी याच सामर्थ्यावर नेम धरला गेला. नौका आणि जहाजे बनवण्यासाठी प्रसिद्ध असलेली भारताची कला आणि कौशल्य पूर्णपणे ठप्प करण्यात आले. यामुळे भारताने समुद्रावरील आपले नियंत्रण आणि धोरणात्मक आर्थिक ताकद गमावली. अशा पार्श्वभूमीवर आज, विकसित होण्याचे ध्येय घेऊन पुढे जात असलेला भारत, आपला हा गमावलेला गौरव पुन्हा प्राप्त करण्याच्या दिशेने वेगाने पावले टाकत आहे. आज केंद्र सरकार, समुद्र आणि त्याच्याशी संबंधित प्रत्येक क्षेत्रावर लक्ष केंद्रीत करून काम करत आहे. आज भारत, सागरी अर्थव्यवस्थेला (ब्ल्यू इकॉनॉमी) अभूतपूर्व असे प्रोत्साहन देत आहे. भारत 'सागरमाला' योजने अंतर्गत, बंदराभिमुख विकासासाठी झटत आहे आणि 'मेरीटाइम व्हिजन' (सागरी संकल्पा) अंतर्गत आपल्या सागरांच्या पूर्ण सामर्थ्याचा वापर करण्याच्या दिशेने वेगाने पुढे जात आहे. म्हणूनच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अलीकडेच म्हटले होते की, 'भारताला एक समृद्ध सागरी वारसा लाभला आहे. आपले मच्छिमार, आपली प्राचीन बंदर असलेली,



# सागरी अर्थव्यवस्था

## सागरी मार्गातून वाहतो भारताच्या आर्थिक ताकदीचा प्रवाह

*भारताच्या आर्थिक ताकदीचा प्रवाह समुद्रातून वाहतो. भारताच्या एकूण व्यापारापैकी, प्रमाणानुसार सुमारे 95% आणि मूल्यानुसार जवळपास 70% व्यापार, सागरी मार्गाद्वारे होतो.*

देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नातील सुमारे 60% इतका वाटा किनारपट्टीवरील राज्यांचा आहे.

एवढेच नाही जवळपास 8 कोटी इतके लोक आपल्या उदरनिर्वाहासाठी समुद्रावर अवलंबून आहेत.

सुमारे 10% एवढा वाटा सध्या जागतिक सागरी व्यापारात भारताचा आहे.

2047 पर्यंत हे प्रमाण तिपटीने वाढवण्याचे उद्दिष्ट आहे.

भारत हा जगातील दुसरा सर्वात मोठा मत्स्य उत्पादक देश असून, जागतिक उत्पादनात भारताचा वाटा 8% आहे.



भारताचे मत्स्यव्यवसाय क्षेत्र सुमारे 3 कोटी लोकांच्या उदरनिर्वाहाचे साधन असून निर्यातीतही त्याचे महत्त्वाचे योगदान आहे.

> *सरकार, कार्यक्षमता वाढवतानाच वाहतूक आणि संपर्क व्यवस्था मजबूत करत आहे. बंदरे, किनारी आर्थिक क्षेत्रे,आधुनिक शहरे (स्मार्ट सिटी) आणि औद्योगिक केंद्रे यांना एकमेकांशी जोडले जात आहे. त्यामुळे उद्योगांना आवश्यक सुविधा एका ठिकाणी मिळतील, गुंतवणूक वाढेल आणि बंदरांच्या आजुबाजूला जागतिक दर्जाचे उत्पादन उद्योग विकसित होतील.*
>
> **- नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

शहरे, हे या वारशाचे प्रतीक आहेत. सौराष्ट्रातील भावनगर हे याचे एक उत्तम उदाहरण आहे. हा वारसा भावी पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी आणि जगाला आपले सामर्थ्य दाखवण्यासाठी, लोथल येथे एक भव्य सागरी संग्रहालय उभारले जात आहे. हे जगातील सर्वात मोठे सागरी संग्रहालय असेल आणि 'स्टॅच्यू ऑफ युनिटी'प्रमाणेच ते भारताची नवी ओळख बनेल".

### सागरी क्षेत्रात जागतिक नेतृत्व करण्याच्या दिशेने वाटचाल करणारा

नवा भारत, आपली निश्चित केलेली उद्दिष्टे, आता ठरवलेल्या वेळेआधीच पूर्ण करून दाखवतो. बंदराभिमुख विकासाबाबत (पोर्ट-लेड डेव्हलपमेंट) 11 वर्षांपूर्वी ठरवलेली उद्दिष्टे गाठण्यात भारत जबरदस्त यश मिळवत आहे. देशात मोठ्या जहाजांसाठी मोठी बंदरे बांधली जात आहेत आणि 'सागरमाला' सारख्या योजनांमुळे बंदरांची संपर्क आणि दळणवळण व्यवस्था वाढत आहे. गेल्या 11 वर्षांत भारताने आपली बंदर क्षमता दुप्पट केली आहे. 2014 पूर्वी भारतामध्ये जहाजांचा 'टर्न अराउंड टाइम' (बंदरात आल्यापासून काम पूर्ण होऊन बाहेर पडेपर्यंतचा वेळ) सरासरी 2 दिवस होता. आता तो एक दिवसापेक्षाही कमी, म्हणजेच सुमारे 60 टक्क्यांनी कमी झाला आहे. देशात नवीन आणि मोठ्या बंदरांचे

# सागरी दृष्टिकोन

## भविष्यातील भारताचा सागरी दृष्टिकोन

*भारताने स्वतःला एक जागतिक सागरी शक्ती म्हणून स्थापित करण्याच्या उद्देशाने सातत्याने ठोस पावले उचलली आहेत. या पार्श्वभूमीवर, 2030 पर्यंत सागरी क्षेत्रात भारत किती सक्षमपणे उभा राहील याचा निर्धार करण्यासाठी एका दृष्टीकोनावर काम सुरू झाले आहे. त्याच वेळी, 2047 पर्यंत विकसित भारत सागरी शक्ती म्हणून किती मजबूत असेल हे निश्चित करण्यासाठीही एक दृष्टी तयार करण्यात आली असून त्यावर काम सुरू आहे.*



### सागरी भारत दृष्टिकोन (एमआयव्ही) 2030

सागरी भारत दृष्टिकोन 2030 हा भारताच्या सागरी क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी एक व्यापक आराखडा प्रदान करतो. यामध्ये बंदरे, जहाजवाहतूक आणि जलमार्ग यांचा समावेश आहे. एमआयव्ही 2030 मध्ये भारताला जागतिक सागरी नेतृत्वाकडे नेण्याच्या उद्देशाने 150 उपक्रमांची रूपरेषा आखण्यात आली आहे.

### सागरी अमृतकाळ दृष्टिकोन 2047

भारत केवळ आपल्या व्यापाराच्या गरजा पूर्ण करण्यासाठी सज्ज नाही, तर सागरी क्षेत्रात अग्रणी म्हणून उदयास येण्यासाठीही सक्षम स्थितीत आहे. या पार्श्वभूमीवर, भारताच्या सागरी पुनरुत्थानासाठी दीर्घकालीन आराखडा म्हणून सागरी अमृतकाल दृष्टी 2047 तयार करण्यात आली आहे. या दृष्टीकोनात बंदरे, किनारी जलवाहतूक, अंतर्गत जलमार्ग, जहाजबांधणी आणि हरित जलवाहतूक उपक्रमांसाठी सुमारे 80 लाख कोटींच्या गुंतवणुकीचा विचार करण्यात आला आहे. वर्ष 2047 पर्यंत या क्षेत्रात 1.5 कोटी रोजगारनिर्मितीकडे भारत वाटचाल करत आहे...



> *आज सागरी व्यापारात भारताचा वाटा केवळ 10% आहे. आपल्याला हा वाटा आणखी वाढवायचा आहे आणि 2047 पर्यंत जागतिक सागरी व्यापारातील आपला वाटा जवळपास तिप्पट करायचा आहे आणि आम्ही हे करून दाखवू.*
>
> **- नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

बांधकामही सुरू आहे. अलीकडेच, देशातील पहिले खोल पाण्यातील कंटेनर ट्रान्सशिपमेंट बंदर केरळममध्ये सुरू झाले. 75 हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्चाने महाराष्ट्रातील वाढवण बंदर उभारले जात आहे. हे जगातील पहिल्या 10 बंदरांपैकी एक असेल.

आज सागरी मार्गाने होणाऱ्या व्यापारात भारताचा वाटा केवळ 10 टक्के आहे. 2047 पर्यंत जागतिक सागरी व्यापारातील आपला वाटा जवळपास तिप्पट करण्याचे उद्दिष्ट भारताने ठेवले आहे. 2047 पर्यंत 8 ट्रिलियन रुपयांची नियोजित गुंतवणूक आणि 1.5 कोटी रोजगारांच्या निर्मितीसह भारत सागरी क्षेत्रात जागतिक नेता बनण्याच्या तयारीत आहे. भारताचा सागरी व्यापार जसजसा वाढत आहे, तसतशी खलाशांची संख्याही वाढत आहे. हे ते मेहनती व्यावसायिक आहेत जे समुद्रात जहाजे चालवतात, इंजिन आणि यंत्रसामग्रीची देखभाल करतात आणि

## सागरी इंफ्रा

# भारताचे सागरी सामर्थ्य होईल मजबूत

*भारताचे भविष्य त्याच्या महासागरांशी अतूटपणे जोडलेले आहे. म्हणूनच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी समृद्ध वारसा आणि सागरी सामर्थ्य मजबूत करण्यासाठी या क्षेत्रातील पायाभूत सुविधा बळकट करण्यावर सातत्याने भर दिला आहे. भारताच्या सागरी क्षेत्रातील सुधारणांमुळे जहाजबांधणी आणि हरित सागरी वाहतुकीमध्ये दिसून येत आहेत ठोस परिणाम...*




**₹ 69,725 कोटींच्या** *विस्तृत पॅकेजला जहाजबांधणीला चालना देण्यासाठी आणि सागरी परिसंस्थेचे पुनरुज्जीवन करण्यासाठी मंत्रिमंडळाने मंजुरी दिली.*

*या पॅकेज अंतर्गत, जहाजबांधणी वित्तीय सहाय्यता योजना (एसबीएफएएस) 31 मार्च 2036 पर्यंत वाढवण्यात आली आहे.*

### नौवहन

भारतीय जहाजांच्या क्षमतेत (ग्रॉस टनेज) 35% वाढ झाली


(क्षमता दशलक्ष जीटीमध्ये)





भारतीय ध्वज असलेली जहाजे/नौका




174% वाढले जहाजांवर काम करणारे कर्मचारी (सी-फेअरर्स)





सागरी क्षेत्रातील महिला खलाशांची संख्या








लोडिंग-अनलोडिंगचे काम बघतात. एका दशकापूर्वी खलाशी सव्वा लाखांपेक्षा कमी होते, पण आज त्यांची संख्या तीन लाखांच्या पार गेली आहे. आज जगाला सर्वाधिक खलाशी पुरवणाऱ्या जगातील पहिल्या तीन देशांमध्ये भारताचा समावेश झाला आहे. यामुळे भारत तरुणांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या आहेत. एकेकाळी दुर्लक्षित असलेले हे क्षेत्र आता विकसित भारताचा पाया बनत आहे. तामिळनाडू आणि दक्षिण भारताला याचा सर्वाधिक फायदा होत आहे. तामिळनाडूमध्ये तीन मोठी आणि एक डझनहून अधिक लहान बंदरे आहेत.




जवळपास सर्व राज्ये किनारपट्टीच्या प्रचंड क्षमतेशी जोडलेली आहेत. सागरी आणि जलमार्ग क्षेत्रांच्या विकासाचा थेट परिणाम तामिळनाडूसारख्या राज्यांच्या विकासावर होतो.

जागतिक बँकेच्या लॉजिस्टिक्स परफॉर्मन्स इंडेक्स (एलपीआय) 2023 नुसार, भारताने आंतरराष्ट्रीय मालवाहतूक श्रेणीत जागतिक स्तरावर 22 वे स्थान आणि लॉजिस्टिक्स परफॉर्मन्स इंडेक्सच्या एकूण गुणांमध्ये 38 वे स्थान मिळवले आहे. गेल्या एक दशकात बंदरांची क्षमता दुप्पट झाली आहे. राष्ट्रीय जलमार्गांचा आठ पटींनी विस्तार झाला आहे. भारतातील क्रूझ प्रवाशांची संख्याही चारपटीने वाढली असून, खलाशांची संख्या दुप्पट झाली आहे.

इतकेच नाही, तर 'महासागर मेरीटाइम व्हिजन'वर वेगाने काम सुरू आहे. आज भारत जगाच्या कानाकोपऱ्यात मानवतावादी मदत देण्यासाठी हजर असतो. आफ्रिकेपासून ते आग्नेय आशियापर्यंत, संकटाच्या काळात जग भारताकडे विश्वबंधुत्वाच्या नजरेतून पाहते. 2014 मध्ये शेजारील मालदीवला पाण्याच्या संकटाचा सामना करावा लागला. भारताने 'ऑपरेशन नीर' सुरू केले आणि भारतीय नौदल स्वच्छ पाणी घेऊन मालदीवपर्यंत



# सागरमाला कार्यक्रम

सागरमाला कार्यक्रमांतर्गत 839 प्रकल्प निश्चित करण्यात आले आहेत जे अंदाजे 5.79 लाख कोटी रुपये खर्चाचे आहेत. यापैकी 119 प्रकल्प सार्वजनिक-खाजगी भागीदारी (पीपीपी) पद्धतीने राबवले जात आहेत.

**280** प्रकल्प झाले पूर्ण

**1.42** लाख कोटी रुपये करण्यात आली गुंतवणूक

- 1.62 लाख कोटी रुपयांचे 209 प्रकल्प अंमलबजावणीखाली असून, 2.75 लाख कोटी रुपयांचे 353 प्रकल्प विकासाच्या विविध टप्प्यांवर आहेत.
- बंदर आधुनिकीकरणाशी संबंधित 35,423 कोटी रुपयांचे 106 प्रकल्प पूर्ण झाले आहेत.
- बंदर जोडणीशी (रस्ते आणि रेल्वे) संबंधित 58,628 कोटी किमतीचे 96 प्रकल्प पूर्ण झाले.
- बंदर औद्योगिकीकरणाचे 45,865 कोटी किमतीचे 9 प्रकल्प पूर्ण झाले, ज्यामुळे 8,000 एकरहून अधिक जमिनीचे औद्योगिकीकरण झाले.
- 11,573 कोटींच्या खर्चाचे किनारी सामुदायिक विकासाचे 81 प्रकल्प सुरू करण्यात आले. यापैकी अंदाजे 2,000 कोटींचे 23 प्रकल्प पूर्ण झाले आहेत.
- मासेमारी बंदराशी ( फिशिंग हार्बर) 1,078 कोटींचे 12 प्रकल्प पूर्ण झाले असून, त्याचा 35,000 हून अधिक मच्छिमारांना फायदा झाला आहे.

*जहाजबांधणी क्षेत्रातील मनुष्यबळात भारत एक नवा पायंडा पाडत आहे. गेल्या दशकात भारतीय खलाशांची संख्या सव्वा लाखांवरून 3 लाखांपेक्षा अधिक झाली आहे. तुम्ही जगातील कोणत्याही समुद्रकिनाऱ्यावर गेलात, तर तुम्हाला भारतीय खलाशी असलेली एक-दोन जहाजे नक्कीच दिसतील. आज, खलाशांच्या संख्येनुसार भारताचा जगातील पहिल्या तीन देशांमध्ये समावेश होतो.*

**- नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

- शहरी जलवाहतुकीशी संबंधित 640 कोटी रुपयांचे 18 प्रकल्प पूर्ण झाल्याने रस्ते आणि रेल्वे वाहतुकीवरील ताण कमी झाला.
- 430 कोटी रुपयांच्या गुंतवणुकीतून सहा समर्पित किनारी धक्के बांधण्यात आले.

कॅपेक्स अर्थात भांडवली खर्चात 228% वाढ






# देशातील प्रमुख बंदरे




**12**
प्रमुख बंदरे सरकारी मालकीची आहेत

**217**
लहान आणि मध्यम आकाराची बंदरे

## नौदल अर्थसंकल्प

| | |
|---|---|
| 49,623 कोटी रुपये | 1,03,548 कोटी रुपये |
| 2020-21 | 2025-26 |






# वाढते सामरिक महत्व

### आयएनएस विक्रांत

भारताचे पहिले स्वदेशी विमानवाहू जहाज 2 सप्टेंबर 2022 रोजी भारतीय नौदलात दाखल झाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आयएनएस विक्रांतवर 2025 ची दिवाळी साजरी केली.

**90,000** कोटी रुपये | खर्चाने 51 मोठी जहाजे बांधली जात आहेत.

- 100 वी आणि 101 वी स्वदेशी युद्धनौका, आयएनएस उदयगिरी आणि आयएनएस हिमगिरी, नौदलात दाखल करण्यात आल्या.
- भारतीय जहाजबांधणी केंद्रांनी 2014 पासून नौदलाला 40 हून अधिक स्वदेशी युद्धनौका आणि पाणबुड्या सुपूर्द केल्या आहेत. गेल्या वर्षभरात सरासरी दर 40 दिवसांनी एक नवीन जहाज सेवेत दाखल झाले आहे.




- संरक्षण खर्चातील नौदलाचा वाटा 15% वरून 21% पर्यंत वाढला आहे.
- 27 फेब्रुवारी 2026 रोजी आयएनएस अंजदीप देखील नौदलात दाखल.
- 2025 मध्ये दोन अत्याधुनिक फ्रंटलाइन फ्रिगेट उदयगिरी (एफ35) आणि हिमगिरी (एफ34) एकाच वेळी नौदलात सामील. दोन प्रमुख पृष्ठभागीय लढाऊ जहाजे एकाच वेळी सामील होण्याची ही पहिलीच वेळ आहे.

पोहोचले. 2017 मध्ये श्रीलंकेला विनाशकारी पुराचा फटका बसला आणि भारताने सर्वप्रथम मदतीचा हात पुढे केला. 2018 मध्ये इंडोनेशियाला त्सुनामीचा तडाखा बसला आणि भारत मदत व बचाव कार्यात इंडोनेशियाच्या लोकांच्या खांद्याला खांदा लावून उभा राहिला. त्याचप्रमाणे, म्यानमारमधील भूकंपामुळे झालेल्या विध्वंसात किंवा 2019 मधील मोझांबिक किंवा 2020 मधील मादागास्करमधील संकट असो, भारताने प्रत्येक ठिकाणी सेवेच्या भावनेने मदतीचा हात पुढे केला. कोविडच्या काळातही लोकांना जलमार्गाने परत आणण्यासाठी 'ऑपरेशन समुद्र सेतू' सुरू करण्यात आले. याचा अर्थ असा की, सागरी शक्ती धोरणात्मक, सामरिक बरोबरच मानवतेच्या हिताचीही एक महत्त्वपूर्ण रक्षक आहे.

# शक्तिशाली उपक्रम

## सागरी शक्ती बळकट करण्याचा उपक्रम

### लोथल संग्रहालय



### सागरी वारशाची झलक

गुजरातच्या लोथलमध्ये भारत आणि नेदरलँड्सने सागरी वारसा अधिक मजबूत करण्यासाठी तसेच सागरी संग्रहालय उभारण्यासाठी एका करारावर स्वाक्षरी केली आहे. हा करार म्हणजे भारताच्या 4,500 वर्षे जुन्या समृद्ध सागरी वारशाला जागतिक स्तरावर नेण्याच्या दिशेने एक ऐतिहासिक पाऊल आहे. पंतप्रधान मोदी म्हणाले की, एकदा पूर्ण झाल्यावर हे जगातील सर्वात मोठे सागरी संग्रहालय असेल. ते भारताच्या प्राचीन सागरी परंपरांचे प्रदर्शन करेल आणि पर्यटन, संशोधन, शिक्षण व कौशल्य विकासाचे केंद्र म्हणून काम करेल.

### सागरी विद्यापीठ

भारतीय सागरी विद्यापीठ (आयएमयू) हे चेन्नई येथे मुख्यालय असलेले एक केंद्रीय विद्यापीठ आहे. आयएमयूची चेन्नई, कोलकाता, विशाखापट्टणम, कोची, मुंबई पोर्ट्स आणि नवी मुंबई येथे सहा संकुले आहेत. तसेच, या विद्यापीठाशी 17 संलग्न संस्था आहेत. 8 एप्रिल 2025 रोजी केंद्रीय बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्री सर्वानंद सोनोवाल यांनी देशभरातील आयएमयूच्या सहा संकुलांमधील 67.77 कोटी रुपयांच्या 26 प्रकल्पांचे उद्घाटन केले.

### सागर सन्मान पुरस्कार

सागरी क्षेत्रातील उत्कृष्ट योगदानाचा गौरव करण्याच्या उद्देशाने सागर सन्मान पुरस्कार दिले जातात. हे पुरस्कार साधारणपणे दरवर्षी 5 एप्रिलला, राष्ट्रीय सागरी दिनाचे औचित्य साधून प्रदान केले जातात. अलिकडच्या वर्षांत या पुरस्कारांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. भारत सरकारच्या धोरणात्मक उपक्रमांतर्गत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने 'सागर सन्मान' हा उपक्रम सुरू केला आहे. सागरी क्षेत्रात स्त्री-पुरुष समानता असलेले सागरी मनुष्यबळ निर्माण करण्याचा याचा उद्देश आहे.

*भारतात बांधलेली जहाजे एकेकाळी जागतिक व्यापाराचा महत्त्वाचा भाग होती. त्यानंतर, आपण जहाज तोडण्याच्या क्षेत्रात प्रगती केली. आता, जहाजनिर्मितीमध्ये नवीन उंची गाठण्यासाठी भारत पुन्हा एकदा आपले प्रयत्न तीव्र करत आहे. भारताने मोठ्या जहाजांना पायाभूत सुविधा मालमत्ता म्हणूनही घोषित केले आहे.*

**- नरेंद्र मोदी,**
**पंतप्रधान**



### धोरणात्मक बदल...

#### कारण समुद्रकिनारे बनावेत समृद्धीची प्रवेशद्वारे

देशाच्या सागरी क्षेत्राला बळकट करण्याकरिता धोरणात्मक बदल करण्यात आले आहेत. सरकारने आता मोठ्या जहाजांना पायाभूत सुविधा म्हणून मान्यता दिली आहे. जेव्हा एखाद्या क्षेत्राला पायाभूत सुविधा म्हणून मान्यता दिली जाते, तेव्हा त्याचे फायदे स्वाभाविकपणे दिसून येतात. मोठ्या जहाजबांधणी कंपन्यांना आता बँकांकडून कर्ज मिळवणे सोपे झाले असून त्यांना व्याजदरात सवलतही देण्यात आली आहे. पायाभूत सुविधांच्या वित्तपुरवठ्याचे जितके फायदे होऊ शकतात ते सर्व या जहाजबांधणी कंपन्यांना मिळत आहेत. केंद्र सरकारच्या या निर्णयामुळे भारतीय जहाजबांधणी





## हरीत बंदर-संबंधी मार्गदर्शक तत्त्वांची ठळक वैशिष्ट्ये...

मालाचे प्रति टन कार्बन उत्सर्जन कमी करण्याचे लक्ष्य: 2030 – 30%, 2047 – 70%


नवीकरणीय ऊर्जेचा वाटा वाढवण्याचे उद्दिष्ट: 2030 – 60%, 2047 – 90%




- 2025 सालापर्यंत, नवीन मंगळूर बंदरात 100% सौरऊर्जेचे एकत्रीकरण साध्य होईल, जे नवीकरणीय ऊर्जा अवलंबनासाठी एक मानदंड ठरेल.
- पर्यावरणाचा दर्जा सुधारण्यासाठी, 2030 सालापर्यंत बंदराचे हरित आच्छादन 20% पेक्षा जास्त आणि 2047 पर्यंत 33% पेक्षा जास्त वाढवण्याचे उद्दिष्ट आहे.
- सुधारित स्रोत व्यवस्थापनाद्वारे 2030 सालापर्यंत सांडपाण्याचा 100% पुनर्वापर करणे आणि गोड्या पाण्याचा वापर 20% पेक्षा जास्त कमी करणे, हे बंदरांचे उद्दिष्ट आहे.

### पर्यटन


सागरी प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या 480% ने वाढली




नदीतील जलपर्यटनांसाठी राष्ट्रीय जलमार्गांची निवड करण्यात आली




दीपगृहांना भेट देणाऱ्यांच्या संख्येत 330% वाढ झाली




जगातील सर्वात लांब, नदीतील 'गंगा विलास' ही जलपर्यटन नौका भारत-बांगलादेश प्रोटोकॉल मार्गाने वाराणसी ते दिब्रुगड असा **3,200 किमीचा** प्रवास करणार आहे. तिचा पहिला सागरी प्रवास 2023 मध्ये पूर्ण झाला.

कंपन्यांवरील भार कमी होत आहे आणि त्यांना जागतिक स्तरावर स्पर्धा करण्यासही मदत करत आहे. भारताला जगातील एक महत्वपूर्ण सागरी शक्ती बनवण्यासाठी केंद्र सरकार आणखी तीन मोठ्या प्रकल्पांवर काम करत आहे. या तीन प्रकल्पांमुळे जहाजबांधणी क्षेत्राला आर्थिक सहाय्य मिळेल आणि जहाजबांधणी केंद्रांना आधुनिक तंत्रज्ञान स्वीकारण्यास, तसेच रचना आणि गुणवत्ता सुधारण्यास मोठी मदत होईल. येत्या काही वर्षांत या प्रकल्पांवर 70,000 कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्च केला जाईल.

जहाजबांधणी हा काही सामान्य उद्योग नाही. जगभरात याला 'सर्व उद्योगांची जननी' म्हणून ओळखले जाते. यात केवळ जहाज बांधणे एवढेच नाही, तर त्याच्याशी संबंधित उद्योगांचा विस्तार करणेही समाविष्ट आहे. पोलाद, यंत्रसामग्री, इलेक्ट्रॉनिक्स, वस्त्रोद्योग, रंग, आयटी प्रणाली आणि इतर अनेक उद्योगांना जहाजबांधणी उद्योगाचा फायदा होतो. लहान आणि सूक्ष्म उद्योगांनाही याचा फायदा होतो. जहाज बांधणीमध्ये गुंतवलेला प्रत्येक रुपया अर्थव्यवस्थेतील



# कायदेशीर सुधारणा

## सागरी क्षेत्रातील कायदेशीर सुधारणांनी घेतला आहे वेग

*भारताच्या सागरी आणि देशांतर्गत जलवाहतूक क्षेत्राचे आधुनिकीकरण आणि स्पर्धात्मक विकास करण्यासाठी सरकारने व्यापक कायदेशीर सुधारणा हाती घेतल्या आहेत. 2025 साली संसदेने मंजूर केलेल्या विविध कायद्यांमुळे आणि नवीन विधेयकांमुळे या क्षेत्राला लाभला आहे मोठा आधार...*

### अधिनियम

- राष्ट्रीय जलमार्ग अधिनियम, 2016
- नौदल (अधिकारक्षेत्र आणि सागरी दाव्यांचे निराकरण) अधिनियम, 2017
- जहाज पुनर्वापर अधिनियम (अंमलबजावणी) अधिनियम, 2019
- मुख्य बंदरे प्राधिकरण अधिनियम, 2021
- अंतर्देशीय जहाज अधिनियम, 2021
- सागरी नौकानयन सहाय्य अधिनियम, 2021

### 2025 साली संसदेत 5 नवीन विधेयके मंजूर झाली...

- किनारी जहाज वाहतूक विधेयक, 2025
- समुद्रमार्गे मालवाहतूक विधेयक, 2025
- मालवाहतूक विधेयक, 2025
- मर्चंट शिपिंग विधेयक, 2025
- भारतीय बंदरे विधेयक, 2025

या क्षेत्रात 'उद्योग सुलभते'ला चालना देण्यासाठी सुमारे 50 नियम, विनियम, धोरणे आणि मार्गदर्शक तत्त्वे लागू करण्यात आली आहेत.

> *ही छत्रपती शिवाजी महाराजांची भूमी आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी सागरी सुरक्षेची केवळ पायाभरणी केली नाही, तर अरबी समुद्राच्या व्यापारी मार्गांवर भारतीय सामर्थ्याचा झेंडाही त्यांनी फडकवला. समुद्र केवळ सीमा नसून संधीची द्वारेही आहेत, हे त्यांच्या दूरदृष्टीने आपल्याला दाखवून दिले. आज भारत त्याच दूरदृष्टीसह पुढे वाटचाल करत आहे.*
>
> **– नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

गुंतवणूक जवळपास दुप्पट करतो, असे अभ्यासावरून दिसून आले आहे. जहाजबांधणी कारखान्यात निर्माण होणारी प्रत्येक नोकरी पुरवठा साखळीत सहा ते सात नवीन नोकऱ्या निर्माण करते. याचा अर्थ असा की जर जहाजबांधणी उद्योगात 100 नोकऱ्या निर्माण झाल्या, तर संबंधित क्षेत्रांमध्ये 600 पेक्षा जास्त नोकऱ्या निर्माण होतात. हे क्षेत्र महत्त्वपूर्ण गुणक परिणाम निर्माण करणारे आहे.

2047 सालापर्यंत, भारत जेव्हा स्वातंत्र्याचा 100वा वर्धापनदिन साजरा करेल, तोपर्यंत भारताला विकास साधायचा असेल, तर त्याला आत्मनिर्भर व्हावेच लागेल. आत्मनिर्भर होण्याशिवाय भारताकडे दुसरा कोणताही पर्याय नाही. 1.4 अब्ज नागरिकांनी एक महत्वाचा संकल्प केला आहेः चिप असो वा जहाज, आम्ही त्याचे उत्पादन भारतातच करू. याच दूरदृष्टीसह भारताचे सागरी क्षेत्रही अत्याधुनिक सुधारणांची अंमलबजावणी करत आहे. आज देशातील प्रत्येक मुख्य बंदर विविध कागदपत्रे आणि विविध प्रक्रियांच्या बंधनातून मुक्त होते आहे.

# भारताची क्रमवारी

## बंदरे आणि लॉजिस्टिक्स क्षेत्रात भारताच्या क्रमवारीत सुधारणा

*गेल्या काही वर्षांमध्ये बंदर-संबंधित पायाभूत सुविधा, डिजिटल लॉजिस्टिक्स आणि परिचालन कार्यक्षमतेतील सुधारणांमुळे जागतिक स्तरावर भारताचे स्थान अधिक मजबूत झाले आहे. जागतिक बँकेच्या कंटेनर पोर्ट परफॉर्मन्स इंडेक्स (लॉजिस्टिक्स परफॉर्मन्स इंडेक्स) मधील भारतीय बंदरांच्या सुधारित क्रमवारीमुळे हे परिवर्तन अधोरेखित होते.*



### बंदरे

- जागतिक बँकेच्या कंटेनर पोर्ट परफॉर्मन्स इंडेक्स (CPPI) नुसार, 2023-24 मध्ये पहिल्यांदाच जगातील अव्वल 30 बंदरांमध्ये दोन भारतीय बंदरांचा समावेश झाला.
- जागतिक बँकेच्या लॉजिस्टिक्स परफॉर्मन्स इंडेक्समध्ये आंतरराष्ट्रीय शिपमेंट श्रेणीमध्ये 2013-14 मधील 44व्या स्थानावरून 2024-25 मध्ये भारताने 22व्या स्थानावर झेप घेतली आहे.



> *देशाच्या सागरी क्षेत्राला नव्या उंचीवर नेण्यात खाजगी क्षेत्रानेही महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. गेल्या 10 वर्षांत सार्वजनिक-खाजगी भागीदारीअंतर्गत हजारो कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात आली आहे. या भागीदारीने केवळ आपल्या बंदरांना जागतिक मानकांपर्यंत अद्ययावत केले नाही, तर त्यांना भविष्यासाठीही सज्ज केले आहे.* **- नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

'एक राष्ट्र, एक दस्तऐवज' आणि 'एक राष्ट्र, एक बंदर' या प्रक्रिया आता व्यापार आणि उद्योग क्षेत्राला अधिक सुलभ करत आहेत. हे साध्य करण्यासाठी ब्रिटिशकालीन कायद्यांमध्ये सुधारणा करण्यात आल्या आहेत. केंद्र सरकारने सागरी क्षेत्रात सुधारणा घडवून आणल्या असून, पाच सागरी कायदे नव्या रूपात देशासमोर सादर केले आहेत. हे कायदे जहाज वाहतूक क्षेत्र आणि बंदर प्रशासनामध्ये मोठे परिवर्तन घडवून आणत आहेत. निःसंशयपणे, भारत शतकानुशतके मोठी जहाजे बांधण्यात पारंगत राहिला आहे. या क्षेत्रातील अद्ययावत सुधारणा, देशाचा हा विस्मृतीत गेलेला गौरव पुन्हा मिळवण्यास मदत करतील. मागच्या दशकात 40 पेक्षा जास्त जहाजे आणि पाणबुड्या नौदलात सामील झाल्या आहेत. त्यापैकी काही अपवाद वगळता, सर्व भारतात बांधण्यात आल्या आहेत. भव्य आयएनएस विक्रांत देखील भारतातच बांधण्यात आली होती. त्याच्या बांधकामासाठी वापरण्यात आलेले उच्च दर्जाचे पोलादही भारतातच बनवण्यात आले होते. याचा अर्थ असा की धोरणात्मक बदल करणारे भारताचे नेतृत्व आता भारताच्या क्षमता आणि कौशल्यांप्रति राजकीय इच्छाशक्ती आणि प्रबळ विश्वास दाखवत आहे, जेणेकरून भारताचा किनारा देशाच्या समृद्धीचे प्रवेशद्वार म्हणून उदयास येऊ शकेल.

### नवीन उपक्रमांमुळे भारत बनत आहे एक मुख्य सागरी शक्ती

21व्या शतकात भारताची लष्करी क्षमता वाढवणे हे देशाच्या प्राधान्यक्रमांपैकी एक आहे. पाणी असो, जमीन असो, आकाश असो, खोल समुद्र असो किंवा विशाल अवकाश असो, भारत सर्वत्र



*2047 सालापर्यंत 8 ट्रिलियन रुपयांची नियोजित गुंतवणूक आणि 1.5 कोटी रोजगारांच्या निर्मितीसह भारत सागरी क्षेत्रात जागतिक नेतृत्वाची भूमिका निभावण्यास सज्ज आहे. आमची 'सागरी अमृत काळ' ही संकल्पना समृद्धी, शाश्वतता आणि आपल्या सागरी वारशाच्या अभिमानावर आधारित आहे, जी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'विकसित भारत 2047 या संकल्पनेशी पूर्णपणे सुसंगत आहे.*

**- सर्वानंद सोनोवाल,**
**केंद्रीय बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्री**



आपल्या हितांचे रक्षण करत आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी भारत सातत्याने कार्यरत आहे.दीर्घ काळापासून सीमा आणि किनारपट्टीवरील कनेक्टिव्हिटी-संबंधित पायाभूत सुविधांकडे दुर्लक्ष झाले होते. मागच्या दहा वर्षांमध्ये या आघाडीवर अभूतपूर्व काम झाले आहे. मागच्या दशकभरात भारताने दुर्गम भागातील आपल्या बेटांवरही लक्ष केंद्रीत केले आहे. त्या निर्जन बेटांवरही सतत लक्ष ठेवले जाते आहे. इतकेच नाही, तर या बेटांना नवीन ओळख देऊन नवीन नावेसुद्धा दिली जात आहेत. हिंद महासागरातील समुद्राच्या तळाशी असलेल्या पर्वतांना अर्थात सी-माऊंटना सुद्धा नावे दिली जात आहेत. 2024 साली भारताच्या पुढाकाराने एका आंतरराष्ट्रीय संस्थेने अशा पाच ठिकाणांना नावे दिली. अशोक पर्वत, हर्षवर्धन पर्वत, राजराजा चोळ पर्वत, कल्पतरू रांग आणि चंद्रगुप्त रांग अशी ती नावे हिंद महासागर क्षेत्रात भारताचा अभिमान वाढवत आहेत.

देशाच्या सागरी क्षेत्राला नव्या उंचीवर नेण्याच्या कामी खाजगी क्षेत्रानेही महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. गेल्या 10-11 वर्षांत सार्वजनिक-खाजगी भागीदारीअंतर्गत हजारो कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात आली आहे. या भागीदारीने बंदरांना जागतिक मानकांनुसार अद्ययावत केले, इतकेच नाही, तर त्यांना भविष्यासाठीही सज्ज केले आहे. खाजगी क्षेत्राच्या सहभागामुळे नवोन्मेष आणि कार्यक्षमता या दोन्हींना चालना मिळाली आहे.

भारताला निश्चितच एक दीर्घ किनारपट्टी, सामरिक जागतिक व्यापारी मार्ग, जागतिक दर्जाची बंदरे तसेच नील अर्थव्यवस्थेसाठी एक व्यापक आणि महत्त्वाकांक्षी दृष्टीकोन लाभला आहे. आज भारताकडे पायाभूत सुविधा, नवोपक्रम आणि स्पष्ट दूरदृष्टी आहे. या क्षेत्राला नवीन परिसंस्थेमुळे चालना मिळत असून, जग भारताच्या पुनरुत्थानशील सागरी विकासाच्या प्रवासात सहभागी होत आहे. ▪







# जल जीवन मिशन 2.0

## 3 मुख्य कनेक्टिव्हिटी प्रकल्पांनाही मिळाली मंजुरी

*केंद्रीय मंत्रिमंडळाने जल जीवन मिशन 2.0 ला मंजुरी दिली आहे, जे केंद्र सरकारच्या जनकल्याणाप्रती असलेल्या वचनबद्धतेचे फलित आहे. या निर्णयामुळे ग्रामीण भागातील कुटुंबांना खात्रीशिररित्या नळाद्वारे स्वच्छ पिण्याचे पाणी मिळेल, शिवाय जल व्यवस्थापनातही सुधारणा होईल. मंत्रिमंडळाने इतर अनेक महत्त्वाच्या प्रस्तावांनाही मंजुरी दिली, ज्यात तीन मुख्य कनेक्टिव्हिटी प्रकल्पांचा समावेश आहे: पश्चिम बंगाल-झारखंड मल्टी-ट्रॅकिंग रेल्वे प्रकल्प, जेवर-दिल्ली एनसीआर ग्रीनफिल्ड कॉरिडॉर आणि चौपदरी उज्जैन-दिल्ली-मुंबई द्रुतगती मार्ग. मंजूर झालेले प्रकल्प या भागांमध्ये रोजगार, पर्यटन आणि उद्योगाला चालना देतील...*

**निर्णय : जल जीवन मिशनचा कालावधी डिसेंबर 2028 पर्यंत वाढवण्यास मंजुरी. वाढीव अर्थसंकल्पासह याची जेजेएम 2.0 म्हणून पुनर्रचना केली जाईल.**

**परिणाम :** संरचनात्मक सुधारणांवर लक्ष केंद्रीत करून जल जीवन मिशनच्या पुनर्रचनेसाठी एकूण अर्थसंकल्पीय तरतूद 8.69 लाख कोटींपर्यंत वाढवण्यास मंजुरी. 3.59 लाख कोटींच्या केंद्रीय मदतीला मंजुरी देण्यात आली आहे. ही रक्कम 2019-20 मध्ये मंजूर झालेल्या 2.08 लाख कोटींपेक्षा जास्त असून, यामध्ये 1.51 लाख कोटींचा अतिरिक्त केंद्रीय वाटा आहे.

- पायाभूत सुविधांबरोबरच जनतेला स्वच्छ पेयजल पुरवण्यावरही लक्ष केंद्रीत करता येईल, अशा प्रकारे या अभियानाची पुनर्रचना केली जाईल. यामुळे पेयजल व्यवस्थापनाला आणि संस्थात्मक व्यवस्थांना बळकटी मिळेल.
- देशभरातील पेयजल पुरवठा प्रणालीच्या स्रोतापासून नळापर्यंत डिजिटल मॅपिंग करण्यासाठी 'सुजलाम भारत' नावाचा एकसमान राष्ट्रीय डिजिटल आराखडा राबवला जाईल.
- जल जीवन मिशन 2.0 अंतर्गत, डिसेंबर 2028 पर्यंत देशभरातील सर्व 19.36 कोटी ग्रामीण कुटुंबांना नळपाणी जोडणी देण्याचे लक्ष्य निर्धारित करण्यात आले आहे.
- भारत सरकार शाश्वत विकास ध्येय 6.1 अंतर्गत 2030 सालापर्यंत सर्वांना सुरक्षित आणि परवडण्याजोगे पेयजल उपलब्ध करून देण्याच्या उद्दिष्टाच्या दिशेने वाटचाल करत आहे.

**निर्णय : मध्य प्रदेशातील दिल्ली-मुंबई द्रुतगती मार्गाच्या (NH-752D) बदनावर-पेटलावद-थंदला-तिमारवानी भागात हायब्रीड ॲन्युइटी मोडवर 3,839.42 कोटी रुपये खर्चाने चौपदरीकरण करण्याला मंजुरी.**

**परिणाम :** स्वीकृत कॉरीडोर उज्जैनला दिल्ली-मुंबई द्रुतगती मार्गावर (डीएमई) तिमारवानी इंटरचेंजशी जोडेल. प्रवासाची कार्यक्षमता सुधारणे हा या प्रस्तावित कॉरिडॉरचा मुख्य उद्देश आहे. यामुळे प्रवासाचा वेळ सुमारे एका तासाने कमी होईल. प्रस्तावित प्रकल्पामुळे हाय-स्पीड कनेक्टिव्हिटी मिळेल. सुधारित सुरक्षितता आणि अखंड वाहतूक प्रवाहासाठी याची रचना प्रस्तावित आहे.

यामुळे वाहतूक कोंडी आणि परिचालन खर्चही कमी होईल. हा प्रकल्प या भागातील पायाभूत सुविधांना बळकटी देईल तसेच मध्य प्रदेशातील धार आणि झाबुआच्या सर्वांगीण आर्थिक विकासाला अधिक गती देईल.

**निर्णय : जेवर आंतरराष्ट्रीय विमानतळाकडे जाणाऱ्या नवीन रस्त्याच्या बांधकामासाठी सुधारित खर्चास मंजुरी.**

**प्रभाव :** उत्तर प्रदेश आणि हरियाणामध्ये हायब्रीड वार्षिक तत्त्वावर दिल्ली-मुंबई द्रुतगती मार्गाच्या दिल्ली-फरीदाबाद-बल्लभगड-सोहना उपमार्गापासून जेवर आंतरराष्ट्रीय विमानतळापर्यंत नवीन रस्ता बांधण्यासाठी 3630.77 कोटींच्या सुधारित खर्चाला मंजुरी देण्यात आली आहे. 31.42 किमी लांबीचा हा कॉरिडॉर दक्षिण दिल्ली, फरीदाबाद, आणि गुरुग्राम ते जेवर आंतरराष्ट्रीय विमानतळापर्यंत थेट, हाय-स्पीड कनेक्टिव्हिटी प्रदान करेल, ज्यामुळे राष्ट्रीय राजधानी क्षेत्रातील आर्थिक वाढ आणि कार्यक्षमतेला चालना मिळेल. हा कॉरिडॉर ईस्टर्न पेरिफेरल एक्सप्रेसवे, यमुना एक्सप्रेसवे आणि समर्पित फ्रेट कॉरिडॉरला जोडेल. हा कॉरिडॉर शहरी भागातील पायाभूत सुविधांचे परिवर्तन, प्रादेशिक कनेक्टिव्हिटी आणि राष्ट्रीय



कॅबिनेटच्या निर्णयांवरील पत्रकार परिषद पाहण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा.

कार्यक्षमतेच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण साधन ठरेल, तसेच संरचनात्मक सुधारणा देखील प्रदान करेल.

**निर्णय : पश्चिम बंगाल आणि झारखंडमधील पाच जिल्ह्यांना सामावून घेणाऱ्या दोन मल्टी-ट्रॅकिंग प्रकल्पांना मंजुरी.**

**परिणाम :** इन या प्रकल्पांचा एकूण अंदाजित खर्च 4,474 कोटी रुपये आहे आणि हा प्रकल्प 2030-31 पर्यंत पूर्ण होईल, अशी अपेक्षा आहे. या प्रकल्पांमध्ये सैंथिया-पाकुड चौथी मार्गिका आणि संत्रागाछी-खरगपूर चौथी चौथ्या मार्गिकेचा समावेश आहे. यामुळे भारतीय रेल्वेच्या सध्याच्या नेटवर्कमध्ये अंदाजे 192 किलोमीटरची भर पडेल. वाढलेल्या रेल्वे लाईनच्या क्षमतेमुळे वाहतूक सुविधेत लक्षणीय सुधारणा होईल, परिणामी भारतीय रेल्वेची परिचालन कार्यक्षमता आणि सेवेची विश्वसनीयता वाढेल. हा मल्टी-ट्रॅकिंग प्रकल्प परिचालन सुव्यवस्थित करण्यास आणि वाहतूक कोंडी कमी करण्यास मदत करेल.

**निर्णय : तामिळनाडूतील मदुराई विमानतळाला आंतरराष्ट्रीय विमानतळ बनवण्यास मंजुरी.**

**परिणाम :** मदुराई विमानतळाला आंतरराष्ट्रीय दर्जा मिळाल्यामुळे प्रादेशिक संपर्क वाढेल, व्यापाराला चालना मिळेल आणि या भागातील आर्थिक विकासाला गती मिळेल. आंतरराष्ट्रीय प्रवासी आणि व्यवसाय हाताळण्याची या विमानतळाची क्षमता या शहराच्या ऐतिहासिक महत्त्वाशी सुसंगत आहे.

**निर्णय : भारतासोबत भू-सीमा सामायिक असणाऱ्या देशांकडून येणाऱ्या गुंतवणुकीसाठीच्या मार्गदर्शक तत्त्वांमधील बदलांना मंजुरी.**

**परिणाम :** मंत्रिमंडळाने भारतासोबत भू-सीमा सामायिक असणाऱ्या देशांकडून येणाऱ्या गुंतवणुकीसाठी थेट परकीय गुंतवणूक - एफडीआय धोरणाला मंजुरी दिली आहे, ज्यामुळे पीएन3 अंतर्गत मंजुरी आवश्यक असलेल्या मुख्य क्षेत्रांमधील गुंतवणुकीला विहित मुदतीत मंजुरी देणे शक्य होईल. स्टार्टअप्स आणि डीप टेकसाठी जागतिक निधीकडून आणखी थेट परकीय गुंतवणूक आकर्षित करणे आणि उद्योग सुलभता आणखी वाढवणे हा या सुधारणांचा उद्देश आहे. 60 दिवसांत जलद निर्णयामुळे कंपन्यांना भारतात उत्पादन वाढवण्यासाठी सहकार्य प्रस्थापित करण्यास मदत होईल. मंत्रिमंडळाने भारतासोबत भू-सीमा सामायिक असणाऱ्या देशांकडून येणाऱ्यागुंतवणुकीसाठी थेट परकीय गुंतवणूक धोरणातील बदलांना मंजुरी दिल्यामुळे इलेक्ट्रॉनिक घटक, भांडवली वस्तू आणि सौर सेलच्या उत्पादनास मदत होईल. ■





33,500 कोटी रुपयांच्या विकास प्रकल्पांची भेट

# एका नव्या युगाची साक्षीदार ठरत आहे दिल्ली

*दिल्ली हे भारतातले ऐतिहासिक शहर आहे. हे शहर आता देशाच्या एका नव्या युगाचे साक्षीदार होत आहे. हे नव्या भारताच्या आत्मविश्वासाचे युग आहे. हा आत्मविश्वास देशाला एका समृद्ध भविष्याकडे घेऊन जाईल. याच दूरदृष्टीला पुढे नेत, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 8 मार्च रोजी दिल्लीतील विविध विकास प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी केली. आपला प्रत्येक संकल्प पूर्ण करण्यासाठी आपण सर्वांनी एकत्र काम करत राहिले पाहिजे, असे ते म्हणाले.*

दिल्ली एक चैतन्यमय शहर आहे... देशाच्या राजधानीचे हे शहर विकसित भारताचा सारथी बनत आहे. दिल्ली राष्ट्राच्या विकासाचे प्रतिबिंब बनत आहे. गेल्या 11 वर्षांत, केंद्र सरकारने एका दूरदृष्टीने देशाच्या राजधानीला एक नवी ओळख दिली आहे. स्वतंत्र भारताचे स्वतःचे संसद भवन असो किंवा भारत मंडपम, यशोभूमी, कर्तव्य पथ, कर्तव्य भवन, राष्ट्रीय युद्ध स्मारक आणि मेट्रो यांसारखे असंख्य उपक्रम असोत, देशाच्या या राजधानीला एक नवीन रूप देण्यात आले आहे. आज, दिल्ली केवळ भारताची राजधानी नाही, तर भारताच्या ओळखीचे आणि ऊर्जेचे प्रतीकही आहे. त्यामुळे, दिल्लीचा विकास हा केवळ एका शहराचा विकास नसून तो संपूर्ण देशाच्या प्रतिमेशी जोडलेला आहे. दिल्ली जितकी अधिकाधिक आधुनिक होईल, तितक्या या शहरामधल्या सुविधा वाढत जातील. ती दळणवळणासाठी उर्वरित देशाशी जितकी जोडली जाईल, तितकाच भारताचा आत्मविश्वास जगासमोर अधिक प्रतिबिंबित होईल. दिल्लीमध्ये अंदाजे 33,500

## दिल्लीत निर्माण करण्यात आली अनेक प्रेक्षणीय स्थळे

- देशासाठी आपल्या प्राणांचे बलिदान देणाऱ्या वीरांच्या सन्मानार्थ राष्ट्रीय युद्ध स्मारक उभारण्यात आले आहे.
- नवीन संसद भवन, कर्तव्य पथ, कर्तव्य भवन आणि सेवा तीर्थ, या सर्वांमधून 21 व्या शतकातील भारताच्या नव्या विचारांचे प्रतिबिंब दिसते.
- भारत मंडपम आणि यशोभूमी यांसारखी ठिकाणे जगाला भारताची संस्कृती, भारताचा व्यापार आणि भारताची क्षमता यांची ओळख करून देण्याचे प्रमुख माध्यम बनली आहेत.
- पंतप्रधान संग्रहालय आणि युगे-युगीन भारत संग्रहालय यांसारख्या नवीन संग्रहालयांनी दिल्लीला एक नवी ओळख दिली आहे.





## मेट्रो प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी

- सरोजिनी नगर येथील जीपीआरए टाईप-5 क्वार्टर्सला भेट देऊन चाव्या संबंधित महिलांकडे सुपूर्द केल्या.
- सुमारे 18,300 कोटी रुपये खर्चाच्या दिल्ली मेट्रो प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी केली.
- दोन नव्या दिल्ली मेट्रो कॉरिडॉर्सचे उद्घाटन: अंदाजे 12.3 किमी लांबीचा मजलिस पार्क-मौजपूर बाबरपूर (पिंक लाईन) कॉरिडॉर आणि अंदाजे 9.9 किमी लांबीचा दीपाली चौक-मजलिस पार्क (मॅजेंटा लाईन) कॉरिडॉर.
- बुरारी, जगतपूर-वझिराबाद, खजुरी खास, भजनपुरा, यमुना विहार, मधुबन चौक, हैदरपूर बदली मोर, भलस्वा, मजलिस पार्क यासह दिल्लीतील अनेक भागांना नवीन जोडणीचा फायदा होईल.
- दिल्ली मेट्रोच्या फेज 5-A अंतर्गत एकूण अंदाजे 16.10 किमी लांबीच्या तीन नवीन कॉरिडॉर्सची पायाभरणीही करण्यात आली.
- हे तीन नवीन कॉरिडॉर्स आर.के. आश्रम मार्ग ते इंद्रप्रस्थ, एरोसिटी ते इंदिरा गांधी विमानतळ टर्मिनल-1 आणि तुघलकाबाद ते कालिंदी कुंज असे आहेत.
- या कॉरिडॉर्समुळे राष्ट्रीय राजधानीतील अनेक महत्त्वाची ठिकाणे थेट जोडली जातील, ज्यामुळे नोएडा, दक्षिण दिल्ली आणि विमानतळांदरम्यान प्रवास करणाऱ्या लोकांसाठी दळणवळणाची सुविधा सुधारेल.

पंतप्रधानांचा संपूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा.

## जीपीआरए अंतर्गत अनेक प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी

**15,200** कोटी रुपयांच्या अनेक प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी पंतप्रधान मोदी यांनी जनरल पूल रेसिडेन्शियल अकोमोडेशन (जीपीआरए) पुनर्विकास योजनेअंतर्गत केली.

- ये हे प्रकल्प सरोजिनी नगर, नेताजी नगर, कस्तुरबा नगर आणि श्रीनिवासपुरी सारख्या प्रमुख ठिकाणी आहेत.
- जीपीआरए वसाहतींचे आधुनिकीकरण करणे आणि सरकारी कर्मचारी व प्रशासकीय कार्यालयांसाठी जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा निर्माण करणे हा सरकारच्या महत्त्वाकांक्षी कार्यक्रमाचा हा एक भाग आहे.
- या प्रकल्पांचा पुनर्विकास एका नाविन्यपूर्ण, स्वयंपूर्ण आर्थिक प्रारूपाद्वारे करण्यात आला आहे. यातून सरकारी तिजोरीवर भार न टाकता पुनर्विकास केला जाईल याची खात्री होते.
- पुनर्विकास योजनेअंतर्गत शासकीय कर्मचाऱ्यांसाठी 9,350 हून अधिक आधुनिक सदनिका उपलब्ध करून दिल्या जातील.
- जवळपास 48 लाख वर्ग फूट कार्यालयीन जागाही निर्माण केली जाईल, ज्यामुळे प्रशासकीय कार्यक्षमतेत लक्षणीय वाढ होईल.

कोटी रुपये खर्चाच्या असंख्य विकास प्रकल्पांचे उद्घाटन आणि शिलान्यास पायाभरणी करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिल्लीतील वेगाने विस्तारणाऱ्या सुविधा आणि पायाभूत सुविधांची नोंद घेतली. काही दिवसांपूर्वीच, नमो भारत एक्सप्रेस या हाय-स्पीड ट्रेनद्वारे दिल्ली मेरठशी जोडली गेली. मेट्रोच्या चौथ्या टप्प्याच्या शुभारंभाने दिल्ली मेट्रोचे जाळे 375 किलोमीटरहून अधिक विस्तारले आहे.

मेट्रोच्या या नवीन विभागांमुळे राजधानीला मोठी सोय उपलब्ध होईल. याचे फायदे राष्ट्रीय राजधानी क्षेत्रातील रहिवाशांनाही मिळतील. दिल्लीतील लोकांना स्वच्छ, आरामदायक आणि आधुनिक बस सेवा मिळावी यासाठी केंद्र सरकार कटिबद्ध आहे. केंद्र सरकारने पुरवलेल्या 4,000 हून अधिक इलेक्ट्रिक बसेस सध्या दिल्लीच्या लोकांच्या सेवेत आहेत. केवळ गेल्या एका वर्षात, दिल्लीच्या रस्त्यांवर अंदाजे 1,800 नवीन बसेस दाखल करण्यात आल्या आहेत. ▪

पंतप्रधान मोदींनी केली कोटा विमानतळाची पायाभरणी

# हाडौतीच्या अपेक्षांना नवी झेप

*राजस्थानमध्ये आज हे दिसून येत आहे की स्पष्ट हेतू आणि दृढ निश्चय, विकासाचा वेग अनेक पटींनी वाढत आहे. येथे विकसित भारताचा निर्धार अधिक दृढ होत आहे. याच दृष्टीने, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 7 मार्च रोजी कोटा विमानतळाची पायाभरणी केली. सुमारे 1500 कोटी रुपये खर्च करून बांधण्यात आलेले हे आधुनिक विमानतळ भविष्यात संपूर्ण प्रदेशाच्या विकासाला गती देईल...*

राजस्थानमधील कोटा शहर आज केवळ शिक्षणासाठीच नाही, तर एक प्रमुख ऊर्जा उत्पादन केंद्र म्हणूनही ओळखले जाते. येथे अणुऊर्जा, कोळसा, गॅस आणि पाणी यांसारख्या विविध स्रोतांपासून वीज निर्माण केली जाते. कोटाची कचोरी, डोरिया साड्या, स्टोन आणि सँड स्टोन जगभरात प्रसिद्ध आहेत. जवळच असलेल्या बुंदी येथील बासमती तांदूळ त्याच्या सुगंधामुळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत प्रसिद्ध आहे. कष्टांसाठी, उत्पादनांसाठी आणि क्षमतेसाठी परिचित असलेल्या या संपूर्ण प्रदेशाला आता विमानतळाच्या बांधकामामुळे एक नवीन ओळख मिळणार आहे. त्यामुळे कोटा आणि आसपासच्या परिसराच्या विकासाला गती मिळेल.

कोटा येथे लवकरच विमानतळ सुरू होणार असल्यामुळे कोटा आणि आसपासच्या परिसरातील लोकांना यापुढच्या काळात विमान प्रवासासाठी जयपूर किंवा जोधपूरला जाण्याची गरज भासणार नाही. विमानतळाच्या पायाभरणी समारंभात, पंतप्रधान नरेंद्र मोदी 2023 च्या कार्यक्रमाचा उल्लेख करत म्हणाले, "मी म्हटले होते की कोटाचे विमानतळ केवळ एक स्वप्न राहणार नाही, तर ते प्रत्यक्षात साकार केले जाईल. आज मला आनंद होत आहे की तो क्षण आला आहे. आता कोटा विमानतळाच्या बांधकामास सुरुवात होणार आहे."

दळणवळणाच्या दृष्टीने कोटा सर्व बाजूंनी मजबूत रीत्या जोडले जाणार आहे. एकीकडे, अमृत भारत स्टेशन योजनेअंतर्गत, कोटा येथील दोन्ही प्रमुख रेल्वे स्थानके आधुनिक सुविधांनी सुसज्ज केली

पंतप्रधानांचा संपूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा.






## हाडौती हे श्रद्धेचेही एक प्रमुख केंद्र

हाडौतीची भूमी ही उद्योग आणि श्रद्धेचे एक प्रमुख केंद्र आहे. शतकानुशतके, देशभरातून आणि जगभरातून भाविक श्री मथुराधीशजींच्या पवित्र स्थानाला, तसेच केशव-राय-पाटन, खडे गणेशजी महाराज आणि गोदावरी बालाजी धाम या तीर्थक्षेत्रांना भेट देण्यासाठी येथे येत आहेत. गराडिया महादेव येथून दिसणारे चंबळचे दृश्य सर्वांना मंत्रमुग्ध करते. मुकुंदरा हिल्स आणि रामगड विषधारीसारखी वन्यजीव अभयारण्ये या संपूर्ण प्रदेशाला वन्यजीव पर्यटनाचे एक प्रमुख केंद्र बनवतात. हवाई संपर्क सुधारेल, तसतसे देशभरातून आणि जगभरातून पर्यटक येथे येतील. याचा थेट फायदा तरुणांना, व्यापा*यांना आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला होईल.

## कोटा विकासाचा नवा अध्याय लिहील: लोकसभा अध्यक्ष

कोटा विमानतळाच्या पायाभरणी सोहळ्याला उपस्थित असलेले लोकसभा अध्यक्ष आणि कोटाचे खासदार ओम बिर्ला म्हणाले की, कोटावासीयांचे ग्रीनफील्ड विमानतळाचे दीर्घकाळचे स्वप्न आता साकार होणार आहे. कोटा विमानतळाच्या बांधकामात अनेक अडथळे आले, परंतु पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली हाडौतीला एक मोठी भेट मिळाली आहे. ते म्हणाले की, मी कोटामध्ये उद्योग उभारण्यासाठी उद्योजकांना भेटायचो, तेव्हा तेव्हा विमानतळ नसल्यामुळे ते पुढे यायचे नाहीत. 2027 सालापर्यंत विमानतळ बांधल्यानंतर, कोटा विकासाची एक नवी गाथा लिहील. उद्योगांच्या आगमनाबरोबरच कोटामध्ये आयटी क्षेत्राचाही विकास होईल. पर्यटन क्षेत्रातही नवीन आयाम विकसित होतील.





*दळणवळण, संपर्कसुविधा वाढते, तेव्हा विकासाची शक्यताही वाढते. गेल्या 11 वर्षांत, देशभरात बांधलेल्या नवीन विमानतळांनी विकासाला गती दिली आहे. या नवीन विमानतळांनी हवाई प्रवास सुलभ केला आहे, पर्यटनाला चालना दिली आहे, तरुणांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण केल्या आहेत आणि प्रादेशिक विकासाला गती दिली आहे.*

**– नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

जात आहेत, तर दुसरीकडे, कोटा आणि बुंदीमधून जाणाऱ्या दिल्ली-मुंबई द्रुतगती मार्गामुळे या संपूर्ण परिसरासाठी विकासाचे नवीन मार्ग खुले होत आहेत. बळकट झालेल्या पायाभूत सुविधांमुळे, दिल्ली, बडोदा आणि मुंबईसारखी प्रमुख शहरे आता केवळ काही तासांच्या अंतरावर आहेत. दळवळणाच्या सुधारलेल्या सुविधेमुळे हा प्रदेश कृषी-आधारित उद्योगांचे एक प्रमुख केंद्र बनेल. ▪




पंतप्रधानांचा संपूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा.

# पायाभूत सुविधांच्या उर्जेने सामर्थ्यवान होतो आहे भारत

*देशाच्या अर्थव्यवस्थेत दक्षिण भारताचे महत्त्वपूर्ण स्थान आहे, म्हणूनच केंद्र सरकार दक्षिणेकडील राज्यांच्या विकासाला गती देण्यासाठी पायाभूत सुविधांमधील गुंतवणूक सातत्याने वाढवत आहे. याच संदर्भात, 11 मार्च रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केरळ आणि तामिळनाडूमध्ये 16,450 कोटी रुपयांच्या विकास प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी केली...*

केंद्र सरकारने अर्थसंकल्पात पायाभूत सुविधांवर खर्च करण्यासाठी 12 लाख कोटी रुपयांची तरतूद केली आहे. त्यातून राष्ट्रीय गुंतवणुकीला चालना देण्यासाठी आणि देशाच्या पायाभूत सुविधांचा विकास करण्यासाठी असलेली त्यांची दृढ वचनबद्धता दिसते. या संदर्भात, 11 मार्च रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केरळमधील एर्नाकुलम येथे 10,800 कोटी रुपयांच्या आणि तामिळनाडूमधील तिरुचिरापल्ली येथे 5,650 कोटी रुपयांच्या विकास प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी केली. या विकास प्रकल्पांमध्ये महामार्ग, रेल्वे, ग्रामीण रस्ते, स्वच्छ ऊर्जा, गॅस वितरण जाळे आणि रिफायनरी यांचा समावेश होता.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तामिळनाडूमध्ये भारत पेट्रोलियमच्या शहर गॅस वितरण जाळ्याची पायाभरणी केली. यामुळे नलगिरी आणि

> *केरळमधील सौर ऊर्जा निर्मितीला चालना देण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. या उद्देशाने, पश्चिम कल्लाडा येथे 50 मेगावॅट क्षमतेच्या तरंगत्या सौर प्रकल्पाचा शिलान्यास करण्यात आला आहे. केरळमध्ये मोठ्या प्रमाणात जलस्रोत आहेत, त्यामुळे येथे तरंगत्या सौर ऊर्जा क्षेत्रासाठी मोठी क्षमता आहे.*
>
> **-नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

## केरळममध्ये या प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी

- बीपीसीएलच्या कोची रिफायनरीमध्ये पॉलीप्रॉपिलीन युनिटचा पायाभरणी समारंभ पार पडला. या पॉलीप्रॉपिलीन युनिटची क्षमता प्रतिवर्ष 400 किलो टन आहे.
- एमएच-66 च्या बालापाडी-चेंगला विभागाचे सहा पदरीकरण आणि वेंगलम ते रामबट्टुकारापर्यंतच्या कोझिकोड बायपासचे सहा पदरीकरण यांसह राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पांचे उद्घाटन. दोन्ही प्रकल्पांसाठी 4,790 कोटी रुपये खर्च.
- पीएमजीएसवाय अंतर्गत बांधण्यात आलेल्या 23 ग्रामीण रस्त्यांचे उद्घाटन.
- अमृत भारत स्टेशन योजनेअंतर्गत शोरानूर जंक्शन, कुट्टीपुरम आणि चंगणसेरी येथील नूतनीकरण केलेल्या रेल्वे स्थानकांचे उद्घाटन.
- शोराजूर-नीलमकूर रोड रेल्वे लाईनच्या विद्युतीकरण प्रकल्पाचे उद्घाटन.
- केरळमधील कोल्लम जिल्ह्यातील वेस्ट कल्लाडा येथे 50 मेगावॅट क्षमतेच्या तरंगत्या सौर ऊर्जा प्रकल्पाची पायाभरणी.

पंतप्रधानांचा संपूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा.





पंतप्रधानांचा संपूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा.

## तामिळनाडूमधील या प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी

- निलगिरी आणि इरोडमध्ये बीपीसीएलच्या 3,680 कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्चाच्या शहर गॅस वितरण जाळ्याचा शिलान्यास करण्यात आला. या प्रकल्पांतर्गत 8.8 लाखांहून अधिक घरांना पीएनजी जोडणी दिली जाईल आणि 201 हून अधिक सीएनजी स्टेशन्स उभारली जातील.
- इंडियन ऑइल कॉर्पोरेशनचा चेन्नई येथील वार्षिक 672,000 मेट्रिक टन क्षमतेचा ल्यूब ब्लेंडिंग प्लांट राष्ट्राला समर्पित करण्यात आला. यासाठी अंदाजे 1,490 कोटींची गुंतवणूक करण्यात आली आहे.
- प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत तामिळनाडूमध्ये 370 किमी लांबीच्या 89 ग्रामीण रस्त्यांचे उद्घाटन.
- एनएच-81 वर गंगईकोंडा चोलापुरम जवळ ग्रीनफिल्ड बायपासचा पायाभरणी समारंभ.

इरोड जिल्ह्यातील जवळपास 9 लाख कुटुंबे आणि अनेक व्यावसायिक आस्थापनांना पीएनजी उपलब्ध होईल. पंतप्रधान मोदी म्हणाले की, या प्रकल्पांमुळे ऊर्जेची उपलब्धता आणि जोडणी वाढेल आणि तामिळनाडूच्या तरुणांसाठी हजारो रोजगाराच्या संधी निर्माण होतील. ते म्हणाले की, या प्रकल्पाचा केवळ आठ वर्षांतील सकारात्मक पर्यावरणीय परिणाम हा 4 कोटी झाडे लावण्याइतका असेल.

नारळाच्या बागा आणि भातशेतीमुळे केरळच्या समृद्धीत आणखी भर पडत आहे. पंतप्रधान मोदींनी विकासाच्या या प्रक्रियेअंतर्गत, केरळमधील 10,800 कोटी रुपयांच्या विकास प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी केली आणि त्यानंतर झालेल्या एका जाहीर सभेत पंतप्रधानांनी राज्याचे 'केरळ' हे नाव बदलून 'केरळम' करणार असल्याची घोषणा केली. केरळला 'केरळम' म्हणून मान्यता देण्याचा निर्णय हा येथील लोकांच्या भावनांची पोचपावती आहे. सेच, हे मल्याळम भाषा आणि संस्कृतीच्या समृद्ध वारशाप्रती असलेल्या आदराचे प्रतीक आहे. यापुढील काळात देश आणि जग या राज्याला 'केरळम' म्हणून ओळखेल, असे ते म्हणाले.

आज जग भारताच्या पायाभूत सुविधांमधील गुंतवणुकीची प्रशंसा करत आहे. केरळम आणि तामिळनाडूमधील पायाभूत सुविधांमधील गुंतवणुकीसंदर्भात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पुनरुच्चार केला की, पायाभूत सुविधांमध्ये गुंतवलेला प्रत्येक रुपया नवीन रोजगार निर्माण करतो. हे प्रकल्प हजारो तरुणांना रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध करून देतील. ■




# ‘अर्थसंकल्प’ जनतेच्या आकांक्षा पूर्ततेचे साधन

*अर्थसंकल्प जाहीर झाल्यानंतर त्याचा लाभ नागरिकांना मिळावा, अर्थसंकल्पात ज्या कामासाठी निधीची तरतूद केली आहे, तिथे तो लवकरात लवकर पोहोचविण्याच्या दिशेने अर्थसंकल्प वेबिनार अतिशय महत्वाचे आहेत. याच कारणास्तव पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 6 मार्चला कृषी आणि ग्रामीण परिवर्तन तर, 9 मार्चला ‘सबका साथ, सबका विकास-जनतेच्या आकांक्षांची पूर्तता’ या विषयावरच्या अनुक्रमे तिसऱ्या आणि चौथ्या अर्थसंकल्प वेबिनारला केले संबोधित...*

भारताच्या दीर्घकालीन विकासाच्या प्रवासात कृषी क्षेत्र धोरणात्मक स्तंभ आहे, हाच विचार घेऊन केंद्र सरकार कृषी क्षेत्र सातत्याने बळकट करत आहे. देश आज अन्नधान्य आणि डाळींपासून ते तेलबियांपर्यंत विक्रमी उत्पादन घेत असल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ‘कृषी आणि ग्रामीण परिवर्तन’ या विषयावरच्या अर्थसंकल्पोत्तर वेबिनारमध्ये सांगितले. मात्र आता 21व्या शतकाचा एक चतुर्थांश भाग संपला आहे, अशा काळात कृषी क्षेत्राला नवी ऊर्जाही तितकीच आवश्यक आहे. या वर्षीच्या अर्थसंकल्पात या दिशेने नवे प्रयत्न करण्यात आले आहेत.

शिक्षण, कौशल्य, आरोग्य, पर्यटन, क्रीडा, संस्कृती यासारखी मुलभूत क्षेत्रे जनतेच्या आकांक्षांच्या पूर्ततेचे मोठे माध्यम आहेत; म्हणूनच अर्थसंकल्पोत्तर वेबिनारमध्ये या

## ‘कृषी आणि ग्रामीण परिवर्तन’ या विषयावरच्या वेबिनारमधले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संबोधनातले ठळक मुद्दे

- या वित्तीय वर्षातल्या केंद्रीय अर्थसंकल्पात कृषी आणि ग्रामीण परिवर्तनाला नवी दिशा देण्यात आली आहे.
- सरकारच्या ठोस प्रयत्नांमुळे शेतकऱ्यांची जोखीम कमी झाली आहे. त्यांना मुलभूत आर्थिक सुरक्षा प्राप्त झाली आहे.
- उच्च मूल्य देणाऱ्या कृषी पिकांना प्रोत्साहन दिल्यास कृषी क्षेत्राचे जागतिक स्तरावर स्पर्धात्मक क्षेत्रात परिवर्तन घडेल.
- निर्यातभिमुख उत्पादनात वाढ झाल्याने प्रक्रिया आणि मूल्यवर्धनाच्या माध्यमातून ग्रामीण भागात रोजगार निर्मिती होईल.
- मत्स्य पालन, ग्रामीण समृद्धीचे उच्च मूल्य आणि उच्च प्रभाव असलेले क्षेत्र आणि निर्यात वृद्धीचा मुख्य आधार बनू शकते.
- सरकार, कृषी क्षेत्रासाठी, ॲग्रीस्टॅकच्या माध्यमातून डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा विकसित करत आहे.
- जेव्हा प्रणाली तंत्रज्ञान आपलेसे करते, संस्था ते एकीकृत करतात आणि उद्योजक त्यावर नवोन्मेश घडवितात तेव्हा तंत्रज्ञान प्रभावी ठरते.
- देशात साठवणीसाठी मोठे अभियान सुरु आहे. लाखो गोदामे उभारली जात आहेत.

# "सबका साथ सबका विकास जनतेच्या आकांक्षांची पूर्तता" वेबिनारमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संबोधनातले ठळक मुद्दे


- भारत आज प्रतिबंधात्मक आणि समग्र आरोग्य हा दृष्टीकोन ठेवून काम करत आहे.
- मागील वर्षांमध्ये देशाचा आरोग्य ढाचा मजबूत झाला आहे. गावा-गावापर्यंत आरोग्य सेवा पोहोचविण्यात आल्या आहेत.
- आयुष्मान भारत योजना आणि आरोग्य मंदिरांच्या माध्यमातून शेकडो जिल्ह्यांमध्ये वैद्यकीय महाविद्यालये उघडण्यात आली आहेत.
- आपला आयुर्वेद आणि योग जगभरात लोकप्रिय होत आहे.
- आपली शिक्षण प्रणाली आणि वास्तविक अर्थव्यवस्था यांची सांगड घालण्याची प्रक्रिया अधिक तीव्र करावी लागेल.
- कृत्रिम प्रज्ञा आणि स्वयंचलन, डिजिटल अर्थव्यवस्था आणि डिझाईन आधारित उत्पादन यासारख्या विषयांवर अधिक लक्ष द्यावे लागेल.
- आज भविष्यवेधी तंत्रज्ञानासाठी आपण सज्ज होत असताना, संधींच्या अभावी कोणतीही मुलगी मागे राहता कामा नये, हे महत्वाचे आहे.
- मागील काही वर्षात क्रीडा क्षेत्राकडे राष्ट्रीय विकासाचे महत्वाचे क्षेत्र म्हणून पाहिले गेले आहे.
- 'खेलो इंडिया' सारख्या उपक्रमामुळे देशाच्या क्रीडा परीसंस्थेमध्ये नवी उर्जा निर्माण झाली आहे,संपूर्ण देशात क्रीडाविषयक पायाभूत सुविधा बळकट केल्या जात आहेत.

पंतप्रधानांचा संपूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी क्युआर कोड स्कॅन करा

*भारतात आपल्याला रसायनमुक्त शेती आणि नैसर्गिक शेतीवर भर द्यावा लागेल. नैसर्गिक शेतीमुळे, रसायन मुक्त उत्पादनांमुळे जागतिक बाजारपेठापर्यंत पोहोचण्यासाठी आपल्याकरिता मार्ग प्रशस्त होतो. यासाठी प्रमाणन, प्रयोगशाळा या सर्व व्यवस्थांवर सरकार काम करत आहे.*

**- नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

6 मार्चच्या अर्थसंकल्पोत्तर वेबिनारमध्ये



पंतप्रधानांचा संपूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी क्युआर कोड स्कॅन करा

*युवक जेव्हा आरोग्य संपन्न असतील, शिस्तबद्ध असतील आणि आत्मविश्वासाने युक्त असतील तेव्हाच युवा शक्ती राष्ट्रीय शक्ती बनते. संस्था, उद्योग क्षेत्र, शैक्षणिक संस्था जेव्हा एकत्र येऊन काम करतात तेव्हा परिवर्तनाचा वेग वाढतो. अर्थसंकल्पानंतर वेबिनारची ही जी मालिका झाली आहे, त्यातून येत्या काळात ठोस दिशा प्राप्त होईल याचा मला विश्वास आहे.*

**- नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

9 मार्चच्या अर्थसंकल्पोत्तर वेबिनारमध्ये

महत्वाच्या आयामांवरही चर्चा झाली. गेल्या एका दशकात देशाच्या मानसिकतेत मोठे परिवर्तन झाल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सबका साथ सबका विकास – जनतेच्या आकांक्षांची पूर्तता या विषयावरच्या अर्थसंकल्पोत्तर वेबिनारमध्ये सांगितले. आज गाव, वस्त्या, शहरे यामधला भारताचा प्रत्येक युवक नवे करू इच्छितो. नव्या पिढीची ही नवी मानसिकता देशाचे सर्वात मोठे सामर्थ्य आहे. उज्वल भविष्याची सर्वात मोठी संपत्ती आहे. त्याचे भांडवलात रुपांतर करण्यासाठी आपली शिक्षण व्यवस्था सातत्याने आधुनिक राखायची आहे. ■

पीएम मुद्रा, ई – नाम आणि युपीआय

# आर्थिक सुरक्षेचे मजबूत चक्र

*जगातल्या झपाट्याने वृद्धिंगत होणाऱ्या अर्थव्यवस्थांपैकी भारत एक आहे. हा वेग कायम राखण्यासाठी सरकार सातत्याने प्रयत्नशील आहे...पंतप्रधान मुद्रा योजनेद्वारे स्वयं रोजगार आणि रोजगाराला चालना देणे असो किंवा ई – नाम सारख्या मंचाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आपला कृषीमाल विकण्याची सुविधा देणे असो. त्याचबरोबर छोट्या-मोठ्या व्यापाऱ्यांसाठी कधीही आणि कोठेही पेमेंट करिता आणि नागरिकांसाठी देवाण-घेवाण सुलभ व्हावी यासाठी सुरु करण्यात आलेले युनिफाईड पेमेंट इंटरफेस (युपीआय) डिजिटल देवाण-घेवाण करत आहे सुलभ आणि समावेशक...*

मागील वर्षी भारत जगातली सर्वात मोठी चौथी अर्थव्यवस्था बनला आहे यावरून भारताच्या अर्थव्यवस्थेच्या मजबुतीचा अंदाज लावणे शक्य आहे. प्रगतीचा हा वेग जारी राखल्यास येत्या अडीच ते तीन वर्षात भारताची अर्थव्यवस्था जगात तिसऱ्या क्रमांकावर पोहोचेल असा अंदाज आहे. इतकेच नव्हे तर 2030 पर्यंत भारताचे सकल देशांतर्गत उत्पादन म्हणजेच जीडीपी 7.3 ट्रीलीयन डॉलरपर्यंत पोहोचेल. यामध्ये सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांचे( एमएसएमई ) मोठे योगदान आहे. देशात 6 कोटीपेक्षा जास्त एमएसएमई आहेत. यातून कोट्यवधी लोकांना रोजगाराच्या संधी मिळाल्या आहेत.

सरकारने एमएसएमईच्या व्याख्येचा गेल्या वर्षीच्या अर्थसंकल्पात पुन्हा विस्तार केला आहे ज्यायोगे सातत्याने आगेकूच करण्याचा आत्मविश्वास त्यांना प्राप्त व्हावा. एका दशकापूर्वी एमएसएमईना सहजपणे कर्ज मिळत नसे, मात्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारच्या कार्यकाळात एमएसएमईना कर्ज मिळणे सुलभ झाले आणि देशाच्या अर्थव्यवस्थेवर याचा सकारात्मक परिणाम दिसून आला. पंतप्रधान मुद्रा योजनेअंतर्गत 37 लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त कर्ज देण्यात आले आहे. हे केवळ आर्थिक सहाय्य नव्हे तर प्रत्येक भारतीयाच्या स्वप्नांना पंख देण्याचे माध्यम ठरले आहे.







पीएम मुद्रा योजना

# उद्योजकता क्रांतीला दिले प्रोत्साहन

**8 एप्रिल 2015 रोजी सुरुवात झाल्यापासूनच पंतप्रधान मुद्रा योजनेने देशभरात उद्योजकता क्रांतीला बळ दिले आहे. वित्तीय समावेशन आणि तळापर्यंत नवोन्मेषाला बळकटी दिली आहे. या योजनेच्या माध्यमातून 56 लाखाहून अधिक कर्जांना मंजुरी मिळाली आहे ज्याद्वारे उद्योगासाठी 37 लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कम झाली आहे उपलब्ध...**

- सूक्ष्म पीएम मुद्रा योजनेद्वारे सूक्ष्म आणि लघु उद्योगांना हमी विना 10 लाख रुपयांपर्यंत कर्ज दिले जाते. यातून रोजगार आणि स्वयंरोजगार शक्य होतो.
- 2024-25 या वित्तीय वर्षात तरुण प्लस या नव्या श्रेणीअंतर्गत मुद्रा कर्जाच्या रकमेत वाढ करून 20 लाख रुपये करण्यात आली. ज्या उद्योजकांनी आपल्या मागच्या कर्जाची परतफेड केली आहे त्यांना हे कर्ज मिळते.
- 2025-26 च्या अर्थसंकल्पीय घोषणामध्ये, सरकारने होमस्टे साठी पंतप्रधान मुद्रा योजनेअंतर्गत एक वेगळी श्रेणी सुरु केली आहे. ग्रामीण भागातील होम स्टे या कर्जाचा लाभ घेण्यासाठी पात्र आहेत.
- पंतप्रधान मुद्रा योजनेच्या सुरवातीपासून 2 जानेवारी 2026 पर्यंत 37.31 लाख कोटी रुपयांची 56.31 कोटीपेक्षा जास्त मुद्रा कर्ज देण्यात आली.



**15.6** Pradhan Mantri mudra Yojna

**लाख कोटी रुपये, योजनेच्या सुरवातीपासून ऑक्टोबर 2025 पर्यंत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागास वर्ग आणि अल्पसंख्यांक उद्योजकांच्या 33.4 कोटी कर्ज खात्यांमध्ये देण्यात आले.**

**69%** **लघु कर्ज महिला उद्योजकांनी मिळवली आहेत.**

*"छोट्या उद्योगांना आपला विस्तार करता यावा यासाठी सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांच्या व्याख्येत बदल करण्यात आला आहे. पत हमी व्याप्ती वाढविण्यात आली आहे. देशातली सर्वसामान्य जनता जी पहिल्यांदाच उद्योग क्षेत्रात पाऊल टाकत आहे त्यांना मुद्रा योजनेद्वारे विना हमी इतकी मोठी रक्कम कर्जाच्या रुपाने देण्यात आली आहे. 50 टक्क्यापेक्षा जास्त लाभार्थी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागास वर्ग कुटुंबातील आहेत. छोट्या उद्योगांनी युवकांच्या मोठ्या स्वप्नांची पूर्तता करावी, असा प्रयत्न आहे."*

**- नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

गेल्या 11-12 वर्षांमध्ये सरकारने सामाजिक सुरक्षेसह रोजगार आणि स्वयं रोजगार वाढविण्यासाठी आर्थिक सुरक्षा चक्रही तयार केले आहे. या धोरणांनी भारताच्या अर्थव्यवस्थेत अभूतपूर्व परिवर्तन घडविले आहे. 2047 या स्वातंत्र्याच्या शताब्दी वर्षात उच्च मध्यम उत्पन्न साध्य करण्याच्या लक्ष्यासह, देश, आर्थिक विकास, संरचनात्मक सुधारणा आणि सामाजिक प्रगतीच्या भक्कम पायावर आगेकूच करत आहे. कोट्यवधी लोकांना सुलभपणे कर्ज मिळू लागले इतकेच नव्हे तर राष्ट्रीय कृषी बाजार (ई-नाम) यासारख्या मंचांनी कृषी मालाच्या विक्रीसाठी शेतकऱ्यांना 1522 बाजारपेठाही उपलब्ध करून दिल्या आहेत. यातून शेतकंऱ्याना आर्थिक सुरक्षा मिळाली आहे.

भारतात, युपीआयने जगभरातील डिजिटल पैशाच्या देवाण घेवाण पद्धतीत बदल घडविला आहे. 2030 पर्यंत भारताची डिजिटल अर्थव्यवस्था देशाच्या एकूण अर्थव्यवस्थेच्या सुमारे एक

राष्ट्रीय कृषी बाजार

# शेतकऱ्यांसाठी बाजारपेठांपर्यंत सहज पोहोच

राष्ट्रीय कृषी बाजार (ई-नाम) ने शेतकरी आणि व्यापाऱ्यांना एक पारदर्शक आणि स्पर्धात्मक डिजिटल मंचाशी जोडले आहे. यामुळे त्यांना कृषिमाल विक्रीच्या अधिक संधी प्राप्त झाल्या आहेत आणि देशभरातले कृषी बाजार परस्परांशी जोडले जात आहेत. या मंचांनी शेतकऱ्यांना जास्त भावाने कृषी माल विक्रीचे स्वातंत्र्य देऊ करत दिले आहे आर्थिक सुरक्षेचे चक्र...



- 14 एप्रिल 2016 रोजी सुरु झालेल्या या मंचावर 4.40 लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त कृषी मालाची उलाढाल झाली आहे.
- ई-नाम मोबाईल ॲप्लिकेशनच्या माध्यमातून 247 अधिसूचित वस्तूंसाठी निःशुल्क मोबाईल – आधरित मूल्य माहिती सेवा प्रदान करण्यात येते.
- ॲप, शेतकऱ्यांना 100 किमी परिघातल्या बाजारपेठांमधल्या किंमती आणि बाजारपेठांपर्यंत पोहोच यांचा नकाशा दाखविते.
- कृषी मालाच्या गुणवत्ता परीक्षणाची सुविधा देते. सफाई, वर्गवारी, वेष्टन यासाठी ढाचा प्रदान करते.
- ई-नामशी जोडल्या गेलेल्या शेतकऱ्यांच्या समस्यांच्या निराकरणासाठी एक टोल –फ्री हेल्प लाईन क्रमांक 1800-270-0224 उपलब्ध आहे.
- भारताच्या कृषी अर्थव्यवस्थेच्या दीर्घकालीन विकासामध्ये ई-नाम योगदान देत आहे. शेतकऱ्यांचे मध्यस्थांवरचे अवलंबित्व कमी झाले.

### ई – नाम जाळे

| | |
|---|---|
| बाजारपेठा | 1,522 |
| व्यापार योग्य कृषी माल | 247 |
| राज्ये आणि केंद्रशासित प्रदेश | 27 |
| नोंदणीकृत शेतकरी | 1.80 कोटी |
| व्यापारी | 2.72 लाख |
| कमिशन एजंट | 1.20 लाख |
| एफपीओ | 4,698 |

*(28 फेब्रुवारी 2026 पर्यंतची आकडेवारी)*

UPI UNIFIED PAYMENTS INTERFACE

# किरकोळ पेमेंटचा सुलभ डिजिटल अनुभव

युनिफाईड पेमेंटस इंटरफेस (युपीआय) मुळे आता किरकोळ पेमेंट सोपे झाले आहे. युपीआयद्वारे दर दिवशी 64 कोटी व्यवहार होत आहेत. 11 एप्रिल 2016 ला सुरु झालेले युपीआय, लोकांसाठी तयार करण्यात आलेली तंत्रज्ञान कथा आहे जी जगभरातल्या लोकांचे जीवन आणि अर्थव्यवस्था आहे जोडत...

**64 कोटीपेक्षा** जास्त व्यवहार युपीआय द्वारे दररोज होतात

**6.5 कोटी** व्यापाऱ्यांना सेवा, 691 बँका युपीआयवर लाईव्ह

- जानेवारी 2026 मध्ये 28.33 लाख कोटी रुपयांचे 21.70 अब्ज व्यवहार झाले.
- भारतात एकूण किरकोळ पेमेंट व्यवहारामध्ये 81% पेक्षा जास्त व्यवहार युपीआय द्वारे होतात.
- 8 इतर देशांमध्येही युपीआय, यामध्ये भूतान, फ्रान्स, मॉरिशस, नेपाळ, कतार, सिंगापूर, श्रीलंका आणि संयुक्त अरब अमिराती यांचा समावेश
- युपीआय देवाणघेवाणीचे प्रमाण लक्षात घेत ही जगातली सर्वात मोठी किरकोळ जलद पेमेंट प्रणाली आहे, यावर आंतरराष्ट्रीय नाणे निधीचेही शिक्कामोर्तब
- जागतिक रियल टाईम पेमेंट प्रणाली देवाणघेवाणीत युपीआयचा सुमारे 49 टक्के वाटा असल्याचे एसीआयच्या जागतिक अहवालात नमूद करण्यात आले आहे.



पंचमांश भाग इतकी असेल, असे एका सर्वेक्षणात म्हटले आहे. गेल्या एका दशकात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशाने तंत्रज्ञान विकासात उल्लेखनीय परिवर्तन पाहिले आहे, ज्यामुळे जागतिक महाशक्ती म्हणून देश पुढे आला आहे. बिगर सरकारी किंवा अनोंदणीकृत अनौपचारिक अर्थव्यवस्थाही याने नियंत्रित केली आहे. तंत्रज्ञानाने पैशांची देवघेव अधिक पारदर्शक केली आहे. ■



PMO India
@PMOIndia

पीएम किसान सन्मान निधी योजना देशातल्या छोट्या शेतकऱ्यांसाठी सामाजिक सुरक्षेचे एक माध्यम बनले आहे : PM @narendramodi गुवाहाटीमध्ये




Rajnath Singh
@rajnathsingh

संरक्षण क्षेत्रात भारत जोमाने आत्मनिर्भरतेच्या दिशेने आगेकूच करत आहे आणि याचे सकारात्मक परिणाम स्पष्टपणे दिसत आहेत. आज भारतीय नौदलासाठी युद्धनौका आणि पाणबुड्या भारतीय शिपयार्डमध्ये बांधल्या जात आहेत. 2030 पर्यंत जगातल्या सर्वोच्च दहा जहाजबांधणी राष्ट्रांमध्ये स्थान प्राप्त करणे आणि 2047 पर्यंत सर्वोच्च पाच मध्ये स्थान मिळविणे, हे आमचे स्पष्ट उद्दिष्ट आहे.



Amit Shah
@AmitShah

डेमोग्राफिक चेंज रोखण्यासाठी UCC प्रभावी ठरेल. मोदी सरकारने आणलेले डेमोग्राफी मिशन लवकरच आपले काम सुरु करेल.



Nitin Gadkari
@nitin_gadkari

गरिबांचे आरोग्य चांगले राहावे, त्यांना कमी दरात औषधे उपलब्ध व्हावीत, या उद्देशाने पंतप्रधान @narendramodi जी यांच्याद्वारे कार्यान्वित करण्यात आलेल्या 'पंतप्रधान भारतीय जन औषधी योजना' अंतर्गत देशातल्या गरीब जनतेला बाजारमूल्याच्या सरासरी तुलनेत 50 ते 90 टक्के स्वस्त औषधे मिळत आहेत. स्वस्त औषधांबरोबरच जन औषधी योजना देशभरात रोजगार निर्मितीसाठीही उपयुक्त ठरल्याचे दिसून येत आहे.



Shivraj Singh Chouhan
@ChouhanShivraj

आज आमच्या कन्या मोठ्या संख्येने कृषी शिक्षणाच्या दिशेने पुढे जात आहेत. याच दिशेने आयसीएआर लवकरच, देशात कृषी संशोधन जाळ्यामध्ये महिला केंद्रित संशोधनाला नवी गती आणि दिशा देणारा एक मंच आणणार आहे.



Giriraj Singh
@girirajsinghbjp

माननीय पंतप्रधान जी यांच्या नेतृत्वाखाली भारतात रोजगाराच्या नव्या संधी आता महानगरांच्या पुढे जाऊन द्वितीय आणि तृतीय श्रेणीच्या शहरांमध्ये झपाट्याने विकसित होत आहेत.
देशातले सुमारे 70% रोजगार महानगरांव्यतिरिक्त शहरांमध्ये आहेत, ज्यामध्ये तृतीय श्रेणीच्या शहरांचा वाटा 40% आहे. वाढत्या औद्योगिक घडामोडी आणि युवकांसाठी नव-नव्या संधींचे हे द्योतक आहे.

## एलपीजी पर दहशत फैलाने वाले अपनी पोल खोल रहे : मोदी

प्रधानमंत्री ने कालाबाजारी करने वालों को कार्रवाई की चेतावनी दी...कहा-राज्य सरकारें रखें नजर

किसानों, नागरिकों पर बोझ नहीं

धैर्य और शांति से करना होगा हालात का सामना

...अतिरिक्त 18 करोड़ बैरल तेल खरीदना होगा



## मेट्रो की रिंग तैयार, अब दिल्ली के किसी भी कोने तक सफर आसान



दीपाली चौक से मजलिस पार्क

## आज का भारत संकट में अपने नागरिकों को कभी अकेला नहीं छोड़ता : पीएम मोदी

केरल में कहा-प. एशिया में फंसे भारतीयों को निकालने में पूरी ताकत लगाई, कांग्रेस राजनीति कर रही





## जल जीवन मिशन 2.0 मंजूर 8.69 लाख करोड़ खर्च होंगे

कैबिनेट ने हर घर नल जल योजना 2028 तक बढ़ाई | देश में एक समान राष्ट्रीय डिजिटल ढांचा 'सुजलम भारत' विकसित होगा



कैबिनेट के फैसले

सामुदायिक भागीदारी मजबूत करने का हर स्तर जल उत्सव

## तेज करना होगा वास्तविक अर्थव्यवस्था से शिक्षा व्यवस्था का जुड़ाव : पीएम मोदी

बजट वेबिनार में कौशल, स्वास्थ्य, पर्यटन, खेल व संस्कृति जैसे क्षेत्रों पर दिया जोर



मोठी कामगिरी

# भारतात चित्त्यांच्या संख्येचे अर्धशतक

*पृथ्वीवरच्या वैशिष्ट्यपूर्ण वन्य जीवांपैकी एक असलेला चित्ता 1952 मध्ये भारतातून लुप्त झाल्याचे जाहीर करण्यात आले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने 'प्रोजेक्ट चित्ता' सुरु केला. सप्टेंबर 2022 मध्ये नामिबिया इथून आणलेल्या 8 चित्त्यांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कुनो राष्ट्रीय उद्यानात सोडले. भारताच्या भूमीवर चित्त्यांच्या संख्येत होत आहे वाढ...9 मार्च 2026 ला नामिबियाच्या 'ज्वाला' या मादी चित्त्याने कुनो राष्ट्रीय उद्यानात पाच बछड्यांना जन्म दिला, ज्यामुळे भारतात चित्त्यांची संख्या 53 झाली आहे...*

- वर्ष 2023 मध्ये भारतीय भूमीवर 70 वर्षानंतर प्रथमच चित्त्यांच्या बछड्यांचा जन्म झाला.
- नोव्हेंबर 2025 मध्ये भारतीय भूमीवर जन्मलेल्या 'मुखी' या पहिल्या मादी चित्त्याने पाच बछड्यांना जन्म दिला.
- नामिबियाच्या 'ज्वाला' या मादी चित्त्याने तिसऱ्यांदा बछड्यांना जन्म दिला असून या बछड्यांची संख्या पाच आहे.
- भारतात जन्मलेल्या बछड्यांची संख्या वाढून 33 वर पोहोचली आहे. एकूण चित्ते 53 झाले आहेत.
- दक्षिण आफ्रिकेच्या 'गामिनी' या मादी चित्त्याने दुसऱ्यांदा बछड्यांना जन्म दिला, तिने 4 बछड्यांना जन्म दिला.
- 28 फेब्रुवारी 2026 ला बोत्स्वानामधून 9 चित्ते भारतात आणण्यात आले, त्यांना कुनोच्या त्यांच्यासाठी करण्यात आलेल्या बंदिस्त जागेत सोडण्यात आले.



'ज्वाला' तिच्या बछड्यांसोबत




न्यू इंडिया समाचार पाक्षिक

आर.एन.आय, DELHIN/2020/78812, 1-15 एप्रिल, 2026

आरएनआय DELHIN/2020/78812 (प्रकाशन दिनांक- 19 मार्च 2026, एकूण पाने -44)

प्रधान संपादक
धीरेंद्र ओझा, मुख्य महासंचालक
पत्र सूचना कार्यालय, नवी दिल्ली

प्रकाशक
कंचन प्रसाद, महासंचालक,
केंद्रीय संचार ब्युरो

खोली क्रमांक - 278, केंद्रीय संचार ब्युरो,
सूचना भवन, दुसरा मजला,
नवी दिल्ली-110003 इथून प्रकाशित